


REGISTERED No. B. 3434

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूली धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख १७ मे, १९५० अंक २०



## बांठिया बँक लिमिटेड

हेड ऑफिस—पनवेल, जि. कुलाबा.

| | |
|---|---|
| अधिकृत व खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. ४,७७,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस | रु. ४७,००० |
| खेळतें भांडवल | रु. ५०,००,००० |

शाखा

| | |
|---|---|
| मुंबई:-६५।६७ झव्हेरी बझार. | पुणें:-१२६८ भवानी पेठ. |
| अहमदनगरः-बझार पेठ. | बेलापूररोडः-पोस्टासमोर, |
| कल्याणः-शिवाजी चौक. | भिवंडीः-बझार पेठ. |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्रीमंत शेट रतनचंद भिकमदास बांठिया, अध्यक्ष.

| | |
|---|---|
| „ „ केशरचंद आनंदराम बांठिया. | श्रीमंत गंगाधर विष्णू ऊर्फ नानासाहेब पुराणिक. |
| „ „ खिवराज आनंदराम बांठिया. | श्री.रा. केशव गोविंद लिमये बी. ए. एलएल्., बी. वकील, पनवेल. |
| „ „ बिरदीचंद भूरनंद बांठिया. | „ जे. एस. कासट बी. कॉम. |
| „ „ चुनिलाल जसरूप मुनोथ. | „ एस. आर. घासवाला |
| „ „ रवजी भिमजी रंगपरिया.(ऑ.मॅजिस्ट्रेट.)★ | „ ताराचंद दगडूराम भंडारी कापडाचे व्यापारी, अहमदनगर. |

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★

*विशेष माहितीसाठीं मुख्य कचेरीस अगर शाखांस लिहा.*

जी. बी. साठे, जनरल मॅनेजर.

## धी बँक ऑफ सिटिझन्स लि.

स्थापना १९३७

मुख्य कचेरी: १५१४ मारुती गल्ली, बेळगांव.

शाखा: बेळगांव, धारवाड, विजापूर व कारवार जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणीं.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | १०,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | ७,००,००० रु. |
| भरलेलें भांडवल | ३,४७,००० रु. |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,००,००० रु. |
| खेळतें भांडवल | ३६,००,००० रु. |

जनरल मॅनेजर

बँक ऑफ सिटिझन्स लि.

बेळगांव.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

पुणें शाखा:-९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारींचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

# पांच हॉर्स पावरचें डिझेल एंजीन

घ्यावयाचें म्हणजे तें किर्लोस्कर पीटरच ! संपूर्ण पंपिंग सेटही मिळेल. चौकशी करा.

**केळकर बंधू, बुधवार चौक, पुणें शहर.**


## विविध माहिती

**अमेरिकन नागरिकांचा आहार**—अमेरिकन सरकारच्या शेतकी खात्यातर्फे आहारविषयक एक अहवाल प्रसिद्ध करण्यांत आला आहे. त्यांतील माहितीप्रमाणें अमेरिकन नागरिकांच्या आहारांत कसाच्या दृष्टीनें युद्धोत्तर कालांत फारसा फरक पडलेला नाहीं. चालू वर्षी दररोज प्रत्येक नागरिकाला ३,२५० कॅलरी उष्णता पुरविण्याइतकें अन्न मिळेल असा अंदाज आहे.गेल्या वर्षापेक्षां ह्या वर्षी १० कॅलरी अधिक मिळणार आहे.

**फक्त अविवाहित स्त्रियांसाठीच**—भारताच्या परराष्ट्रीय खात्यांत फक्त अविवाहित स्त्रियांनाच नोकरी देण्यांत येणार आहे. अपत्य नसलेल्या विधवांनाही ह्या खात्यांत प्रवेश मिळेल. अशा स्त्रियांनीं विवाह अगर पुनर्विवाह केल्यास त्यांना कामावरून दूर करण्यांत येईल. ह्या अटीवरच नेमणुका करण्यांत येणार आहेत.

**पंजाबमधील वानर सत्र**—पंजाबच्या १३ जिल्ह्यांत मिळून फेब्रुआरी १९५० अखेर सुमारें ३६,००० वानरांना गोळ्या घालून मारण्यांत आलें. माकडें मारल्याचा पुरावा म्हणून त्यांच्या शेपट्या मॅजिस्ट्रेटपुढें दाखल कराव्या लागतात. त्याच त्याच शेपट्या पुन्हा दाखवितां येऊं नयेत म्हणून मॅजिस्ट्रेटसाहेब त्या आपल्या देखरेखीखालीं नष्ट करून टाकतात.

**सीलोन रिझर्व्ह बँकेचा गव्हर्नर**—अमेरिकेंतील एक बँकिंग तज्ज्ञ मि. जॉन एक्झटर ह्यांना सीलोनच्या रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची जागा देऊं करण्यांत आली आहे. अमेरिकन सरकारनें सीलोनला बँकिंगविषयीं सल्ला देण्यासाठी त्यांना त्या देशांत पाठविलें होतें. सीलोनच्या आर्थिक साधनसामुग्रीचा विकास करण्यासाठी त्यांच्यासारख्या तज्ज्ञाची जरूरी आहे, म्हणून सीलोन सरकार अमेरिकेकडे त्यांची मागणी करणार आहे.

**नर्सेसची टंचाई**—जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीप्रमाणें, जगांत नर्सेसचा तुटवडा असल्यामुळें आरोग्यविषयक योजना पार पाडल्या जात नाहींत अशी स्थिति आहे. कांहीं देशांतून दर चारशे लोकसंख्येला एक नर्स असें प्रमाण पडतें; तर इतर कांहीं देशांतून लक्षावधि नागरिकांमागें एक नर्स असें प्रमाण पडतें. पुढारलेल्या देशांतून सुद्धा नर्सेस इतक्या कमी आहेत कीं इस्पितळांत रोग्यांच्या खाटा रिकाम्या असून सुद्धां नर्सेसच्या अभावीं रोग्यांना दाखल करून घेतां येत नाहीं.

**संयुक्त प्रदेश राज्यांतील करमणुकीचा कर**—मार्च १९५० रोजीं पुऱ्या झालेल्या ७ महिन्यांत संयुक्त प्रदेश सरकारनें ६२ लाख रुपये करमणुकीवरील करांच्या रूपानें गोळा केले. राज्यांत २०२ सिनेमागृहें आणि ९० फिरते सिनेमा आहेत. वरील कालावधींत ३ कोटी लोकांनीं सिनेमाचे खेळ पाहिले असा अंदाज करण्यांत आला आहे.

**ब्रिटनमधील भारतीय मतदार**—ब्रिटनमध्यें नुकत्याच झालेल्या पार्लमेंटच्या निवडणुकांत १५,००० भारतीय नागरिकांना मतदानाचा हक्क होता; त्यापैकीं १०,००० नागरिकांनीं तो बजावला.

**रशिआंतील वृत्तपत्रें आणि नियतकालिकें**—रशिआंत सुमारें ७,२०० वृत्तपत्रें प्रकाशित होतात. त्या सर्वांचा मिळून खप ३·२ कोटी प्रतींपेक्षां अधिक असावा असा अंदाज आहे. शास्त्रीय, राजकीय, आर्थिक, कलाविषयक आणि इतर नियतकालिकें मिळून १,७६० प्रसिद्ध होतात. त्या सर्वांचा मिळून खप २ कोटी प्रती होतो. त्याशिवाय कारखाने, सामुदायिक शेतवाड्या अगर इतर संस्थांत मिळून १,००,००० 'भिंतीवरील वृत्तपत्रें' निघतात.

**चित्रपटगृहांवर निर्बंध**—मद्रास सरकारनें सिनेमागृहांना परवाने देण्यासंबंधीं लोकसंख्येवर आधारलेले कांहीं नवीन निर्बंध घालण्याचें ठरविलें आहे. ज्या गांवीं ५०,००० पेक्षां अधिक वस्ती असेल त्या गांवांत कायमच्या सिनेमागृहांच्या संख्येवर निर्बंध घालण्यांत येणार नाहींत. २० हजार लोकसंख्येपेक्षां जास्त परंतु ३० हजारापेक्षां अधिक नाहीं, अशा गांवांत एक कायमचा सिनेमा आणि एक फिरता सिनेमा ह्यांना परवाना देण्यांत येईल. लोकसंख्या ३० ते ४० हजार असेल तर दोन कायमचे आणि एक फिरता सिनेमा, ४० ते ५० हजार पर्यंतच्या गांवांना २ कायमचे आणि २ फिरते सिनेमा, ५० हजारांवर लोकसंख्या असलेल्या गांवाच्या तीन मैलांच्या परिघांत फिरत्या सिनेमाला परवाना देण्यांत येणार नाहीं.

**आपल्या मालकीचा फोन**—स्वतःच्या मालकीचा टेलिफोन घेण्याच्या योजनेला मुंबई शहरांत चांगला पाठिंबा मिळत आहे. ता. १ जानेवारी १९५० पासून ह्या योजनेला प्रारंभ झाला. तेव्हांपासून एकूण ३,१५१ अर्ज आले आणि ७९ लाख रुपये जमा झाले. आतांपर्यंत ९७० अर्जदारांना टेलिफोन देण्यांत आले आहेत.

**लष्करी विमानांचें उत्पादन**—हिंदुस्थान एअरक्रॅफ्ट फॅक्टरीच्या संचालकांची बैठक बंगलोर येथें नुकतीच भरली होती. सध्या लष्करी विमानांची जुळवाजुळव करण्याचें काम कंपनीनें हातीं घेण्याचें ठरविलें आहे. नंतर आधुनिक पद्धतीचीं मोठीं लष्करी विमानेंही कंपनी बनविणार आहे. एका परदेशीय कंपनीशीं ह्यासंबंधीं करार करण्यांत आला आहे.

**अमेरिकेंतील छोट्या धंद्यांना मदत**—अमेरिकेंतील स्वतंत्र छोट्या धंद्यांना मदत करण्याची एक योजना प्रे. ट्रुमन ह्यांनीं जाहीर केली आहे. अमेरिकेंतील ४० लाख उद्योगधंद्यांपैकीं ९० टक्के कंपन्यांची गणना अशा छोट्या धंद्यांत होते. ह्या धंद्यांतून २ कोटी लोकांना काम मिळतें. ह्या कंपन्यांनीं आपली उपयुक्तता पटवून दिल्यावर, त्यांना अल्प आणि दीर्घ मुदतीचीं कर्जें देण्यासाठी खास कंपन्या काढण्यांत याव्या, अशी प्रे. ट्रुमन ह्यांची योजना आहे.

**ब्रह्मदेशाला कर्ज**—कम्युनिझमच्या लाटेला थोपवून धरण्यासाठी ब्रह्मदेशाच्या सरकारला ३७,५०,००० पौंड कर्ज देण्यास ब्रिटिश पार्लमेंटनें मंजुरी दिली आहे. ब्रिटिश राष्ट्रसंघानें ब्रह्मदेशाला द्यावयाच्या ६०,००,००० पौंड कर्जापैकीं ही रक्कम आहे. उरलेलें कर्ज भारत, पाकिस्तान, ऑस्ट्रेलिआ आणि सीलोन ह्यांनीं द्यावयाचें आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ मे, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सिडने परिषदेचें हिंदच्या दृष्टीनें महत्त्व

१५ मेला सिडने येथें भरणारी कॉमनवेल्थ मंत्र्यांची परिषद साम्राज्यांतील घटक राष्ट्रांच्या दृष्टीनें व त्यांतल्या त्यांत आशिया खंडांतील राष्ट्रांच्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची आहे. कारण या परिषदेमध्यें ऑस्ट्रेलियाचे प्रधान मि. स्पेंडर यांनीं पुरस्कारिलेल्या योजनेचा विचार केला जाणार आहे. आशिया खंडांतील कॉमनवेल्थमधील राष्ट्रांचा परस्परांशीं व इतर देशांशीं व्यापार वाढावा हा स्पेंडर यांच्या योजनेचा मुख्य हेतु आहे. हा हेतु साध्य करण्यासाठी दक्षिण व आग्नेय आशियांतील देशांचें उत्पादन कसें वाढवावें व तेथील लोकांचें राहाणीचें मान कसें वाढवावें याचा विचार मुख्यतः केला जाईल. त्याचप्रमाणें निरनिराळया देशांमधील कांहीं प्राथमिक वस्तूंच्या किंवा कच्च्या मालाच्या व्यापाराच्या बाबतींत कराव्या लागणाऱ्या करारांचाहि या परिषदेंत विचार केला जाईल. या देशांपैकीं मागासलेल्या भागांची आर्थिक प्रगति एकमेकांच्या संघटित प्रयत्नांनीं कशी घडवून आणतां येईल याबद्दलहि योजना आंखण्यांत येईल किंवा अशा योजनेच्या दृष्टीनें पूर्वचर्चा केली जाईल. ऑस्ट्रेलियाचा हिंदशीं चालणारा व्यापार गेल्या दोन वर्षांत सुमारें ७० टक्क्यांनीं वाढला आहे. ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या महायुद्धांत विशेष महत्त्व प्राप्त झालें व हें महत्त्व अशिया खंडाच्या दृष्टीनें टिकून राहाणें व त्याची वाढ होणें ऑस्ट्रेलियाला आवश्यक आहे. ऑस्ट्रेलियाला अशा प्रकारें पुढारीपण मिळविण्याची इच्छा असली तरी भांडवल व मनुष्यबळ या दोहोंच्या दृष्टीनें ऑस्ट्रेलियाची परिस्थिति कमकुवत आहे. तेव्हां परिणामीं ऑस्ट्रेलियाचें महत्त्व शक्य होणाऱ्या उत्पादन-वाढीवर व परराष्ट्रांशीं चालणाऱ्या व्यापाराच्या वाढीवर अवलंबून आहे.

आशिया खंडांतील देश आपल्या दारिद्र्याविषयीं प्रसिद्ध आहेत. यापैकीं कांहीं देशांची मूलभूत आर्थिक परिस्थिति विकास-योजनेला साधारण अनुकूल असली तरी राजकीय अस्थिरतेमुळें त्यांची परिस्थिति चमत्कारिक झाली आहे. अशा प्रकारची परिस्थिति असलेले देश म्हणजे ब्रह्मदेश व इंडो-चायना व इंडोनेशिया हे आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं. हिंदसारख्या देशांत दर वर्षी सुमारें तीस लक्ष लोकांनीं वाढत जाणारी लोकसंख्या, सुमारें ३० ते ४० लक्ष टन धान्याची करावी लागणारी आयात, भांडवलाचा तुटवडा व यंत्रज्ञ तरुणांचा अभाव या आर्थिक प्रगतीच्या आड येणाऱ्या मुख्य गोष्टी आहेत. या प्रमुख गरजांचा विचार सिड्ने परिषदेंत होऊं शकला तरच त्या परिषदेंतील चर्चा हिंदच्या दृष्टीनें फायदेशीर ठरूं शकेल. हिंदचे उद्योगधंदे वाढून राहाणीचें मान वाढलें तर त्याचा अनुकूल परिणाम व्यापाराच्या रूपानें आशिया खंडांतील इतर देशांवर होणें अगदीं शक्य आहे. परंतु हिंद आहे तसाच दरिद्री राहिला व गेल्या तीन वर्षांत ज्याप्रमाणें हिंदची आर्थिक क्षेत्रांत प्रगति झाली नाहीं, तशीच स्थिति कायम राहिली तर हिंदची ही परिस्थिति संसर्गजन्य रोगांप्रमाणें इतर देशांनाहि कांहीं प्रमाणांत भोवल्याशिवाय राहाणार नाहीं. तरी सिडने परिषदेंत हिंदच्या या मूलभूत प्रश्नांचा विचार होणें आवश्यक आहे.

## जपानची स्पर्धा जाणवूं लागली

फेडरेशन ऑफ ब्रिटिश इंडस्ट्रीज ह्या संस्थेचे एक प्रतिनिधी मि. मॉरिस वॅट ह्यांनीं हिंदुस्थान, पाकिस्तान, सीलोन आणि ब्रह्मदेश ह्या चार देशांत नुकताच एक दौरा काढला होता. ह्या दौऱ्यांत त्यांनीं २७,००० मैलांचा प्रवास करून ठिकठिकाणच्या बाजारपेठांची पाहणी केली. त्यांना असें आढळून आलें कीं वरील सर्वच देशांत जपानची स्पर्धा ब्रिटिश कारखानदारांना जाणवूं लागली आहे. निर्यात मालाची बाजारपेठ म्हणूनच केवळ नव्हे, तर औद्योगिक यंत्रसामुग्री बाबतही जपानची चढाओढ ब्रिटिश कारखानदारांना जाचत असावी असें मि. वॅट ह्यांच्या लंडनमधील वक्तव्यावरून दिसतें. मि. वॅट ह्यांनीं निरनिराळ्या देशांतील परिस्थिती पुढीलप्रमाणें वर्णन केली आहे: —

**भारत**—भारताची फाळणी झाल्यापासून बरीच प्रगति करण्यांत आली आहे. तथापि सरकारी आणि खाजगी औद्योगिक योजना मंदगतीनेंच अंमलांत आणण्यांत येत आहेत. त्यामुळें देशांत कांहींसें नैराश्याचें वातावरण पसरलें आहे. भारताला आपल्यापुढील प्रश्न सोडविण्यांत यश आलें तर, ह्या देशांत औद्योगिक यंत्रसामुग्रीला बरींच वर्षे चांगली बाजारपेठ मिळूं शकेल.

**पाकिस्तान**—ह्या देशानेंही गेल्या अडीच वर्षांत चांगली प्रगति केली आहे. पाकिस्तानला आपली आर्थिक व्यवस्था पहिल्यापासून नव्यानें बसवावी लागली. पाकिस्तान आर्थिक आणि राजकीय दृष्ट्या भक्कम पायावर उभें करण्याचा त्या राष्ट्राच्या सरकारचा निश्चय आहे.

**सीलोन**—सीलोनची भरभराट चहा, रबर आणि खोबरें ह्या तीन वस्तूंच्या जागतिक बाजारांतील किंमतींवर मुख्यतः अवलंबून आहे. बेटांतील अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें आणि निर्यात व्यापार वाढविणें ह्या दोन गोष्टींवर सीलोनचें भवितव्य अवलंबून आहे. देशांत उत्पन्न होणाऱ्या शेतीच्या मालापासून ग्राहकांना लागणाऱ्या वस्तू तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांची वाढ होणेंही अवश्य आहे. असें झालें तरच त्या देशांतील लोकांच्या रहाणीचें मान वाढेल.

**ब्रम्हदेश**—दुसऱ्या महायुद्धापूर्वींच्या परिस्थितीशी तुलना करतां सध्याची परिस्थती निराशाजनक आहे. कॉमनवेल्थ देशांनीं ६० लाख पौंडांचे देऊं केलेलें कर्ज ब्रम्हदेशांत स्थिरस्थावर होईल ह्या आशेवर दिलेलें आहे. ब्रम्हदेशांतील लोकांना उद्योगधंद्यांच्या व्यवस्थेबद्दल अजून बरेंच शिकावयाचें आहे. राष्ट्राभिमानामुळें ह्या गोष्टी ते टक्केटोणपे खाऊन शिकत आहेत. परंतु ब्रम्हदेशांत नैसर्गिक संपत्ति पुष्कळ आहे. सध्या ती वाया जात आहे. संपत्तीचा जसजसा उपयोग केला जाईल त्या प्रमाणांत ब्रम्हदेश प्रगति करील ह्यांत शंका नाहीं.

## दि रत्नाकर बँक लि. ची वार्षिक सभा

### अध्यक्ष श्री. बी. बी. पाटील, यांचें ६ व्या वार्षिक सभेच्या वेळचें भाषण

गेल्या सहा वर्षांत बँकेची प्रगति कसकशी होत गेली याची कल्पना यापुढें जी माहिती दिली आहे त्यावरून करून येणार आहे.

(आंकडे हजारी)

| साल | वसूल भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | हुंड्या, बिलें व इतर कर्जे | कर्जरोखे. | कॅश व बँक शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| १९४७ | ३१४ | ३० | २६७१ | १७६५ | २०८ | ११२५ |
| १९४८ | ३१४ | ४० | ३८०५ | २३७० | ६०९ | १२४८ |
| १९४९ | ५०३ | ५१ | ३९५१ | १८५३ | ७५७ | २०२६ |

| | १९४७ | १९४८ | १९४९ |
|---|---|---|---|
| सेव्हिंग्ज ठेवी | ८३१ | ११७७ | १३६९ |
| मुदत ठेवी | ७२८ | ७६० | ८९३ |

रिपोर्टाचे सालीं कॅश व बँक शिल्लक बरीच वाढल्याचें दिसतें व त्या मानानें कर्जें कमी दिसतात. याचें मुख्य कारण १९४९ अखेरी कॅशक्रेडिट खात्याप्रमाणेंच मुदत हुंडी खात्यावरील कर्जें भागवून घेण्याचा नवीन सुरूं केलेला उपक्रम हें होय. अनुभवांतीं असें आढळून आलें आहे कीं, एकाच खातेदाराची अनेक बँकांतून कर्जें असत व तीं सतत फिरती ठेवलीं जात. मुदतहुंडीवर कर्ज काढून कॅशक्रेडिट खातें पुरें केलें जात असे व अशामुळें खातेदारांची खरी कसोटी व पत कळून येत नसे. बँकेकडून प्रमाणाबाहेर कर्जें काढणें व फारसा विचार न करतां तीं गुंतविणें ही गोष्ट हल्लींच्या नाणेभीडीच्या दिवसांत व्यापाऱ्यांना फारशी हितावह नाहीं. त्यांनीं आपल्या गरजा योग्य प्रमाणांत ठेवणें अधिक हितकर आहे. असें जे व्यापारी करणार नाहींत त्यांना भावी कालांत वरील प्रकार थोडा फार त्रासाचा व जिकीरीचा होईल. ठेवीदारांच्या हिताच्या दृष्टीनें तर यामुळें अधिक दक्षता घेणें जरूर आहे.

विश्वासानें जमा केलेल्या ठेवींचें योग्य रक्षण करणें हें चांगल्या बँकांचें मुख्य व महत्त्वाचें कर्तव्य असल्यामुळें कर्जें योग्य प्रमाणाबाहेर वाढूं न देणें व दिलेल्या कर्जाची वसूली वेळेवर करण्यांत योग्य ती दक्षता घेणें अगदीं जरूर आहे. बँकेच्या यशाचा हा पाया आहे.

मध्यवर्ती सरकारनें आतांपर्यंत अवलंबिलेली स्वस्त दरानें चलन निर्माण करणेची पॉलिसी ( *Cheap Money Policy* ) आतांपर्यंत फारशी यशस्वी झालेली नाहीं. सुखवस्तु मध्यम वर्गाकडून सुरक्षितपणाच्या गुंतवणुकी ( *Investments* ) वाढविणेसाठीं त्यांना चालूं परिस्थितीच्या मानानें योग्य व्याज देणें अगदीं जरूर आहे. तें न दिसल्यास अत्यंत उपयुक्त असा पैसा इतक्या नाणेभीडीच्या दिवसांत ठेवरूपानें येणें कठीण होईल. तेव्हां या दृष्टीनें आपल्या बँकेच्या व्याज देण्याच्या धोरणांत बदल करणेची तूर्त गरज दिसत नाहीं.

बँकेचें धोरण अत्यंत सावधतेचें व संयमाचें असून नफ्याच्या वाढीकडे लक्ष न देतां बँकेची एकंदर इभ्रत, ठेवीदारांचा बँकेवरील विश्वास, व्यापाऱ्यांचें दळण वळण व देवघेव व इकडील आर्थिक प्रपंचांतील आपलें महत्त्वाचें स्थान हें संतत वाढविण्याकडे व वाढवून तें टिकविण्याकडे बँकेचें लक्ष कटाक्षानें आहे.

सामान्यतः देशांतील वातावरण आजतरी मनाला प्रसन्न वाटणारें नाहीं. हिंदुस्थानचे व पाकिस्तानचे संबंध दिवसेंदिवस बिघडूं लागले आहेत. काश्मिरचा प्रश्न अद्याप अनिर्णितच आहे. निरनिराळ्या तऱ्हेच्या व्यापारावर निरनिराळ्या तऱ्हेचीं नियंत्रणें बसलीं आहेत. मंदी निर्माण करण्यासाठी सरकारनें केलेली सर्व उपाययोजना फारशी यशस्वी झालेली नाहीं. बेकारी वाढूं लागली आहे, महागाई पराकाष्ठेची झालेली आहे, व्यापाऱ्यांचा वसूल वेळेवर न आल्यानें व बँकांवरील कर्जाच्या निर्बंधामुळें नाणेभीड वाढतच आहे. मध्यम वर्गावरील कराचें ओझें असह्य झालें आहे. चोऱ्या, लूट, मारामाऱ्या वाढीस लागलेल्या आहेत. एकूण परिस्थिति बरीच अडचणीची व काळजी निर्माण करण्यासारखी झाली आहे.

बंगालमधल्या कांहीं बँकांचें एकत्रीकरण झाल्याचें आपण वाचलेंच असेल. संस्थानांचें विलीनीकरण करून जसा भारताचा नकाशा बदलला गेला तसा बँकांचें एकत्रीकरण करून आर्थिक स्थिरता वाढवावी असा एक विचार निर्माण झाला आहे व तो हळूंहळूं वाढीस लागला आहे. तेव्हां आपलें स्वतंत्र अस्तित्व स्थिर व भक्कम पायावर टिकविण्यासाठी आपली शक्ति मोठी करणें हा एकच उपाय आहे. ही शक्ति वाढविण्याचा एकच राजमार्ग म्हणजे खेडोपाडीं, इष्टमित्रांत बँकेचा योग्य प्रचार करून दैनंदिन जीवनांत बँकेची गरज निर्माण करणें व तिच्यामार्फत आपला सर्व व्यवहार करणें, ठेवी वाढविणें—थोडक्यांत बँकिंगची संवय निर्माण करणें व वाढविणें हें होय.

यापुढील १२ वर्षांत आपल्या बँकेचें खेळतें भांडवल किमान एक कोटी रुपयांचें तरी व्हावें, अशी महत्त्वाकांक्षा धरून आपण प्रयत्न कराल तर आपली निराशा होणार नाहीं असा मला विश्वास वाटत आहे. या इच्छित ध्येयांत यश मिळविण्यासाठी आपणां सर्वांच्या एकजुटीच्या व एकदिलाच्या सहकार्याची मदत होऊन आपल्या बँकेचें नांव व बँकेची कीर्ति उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जाईल अशी उत्कट आशा मी प्रदर्शित करितों. सांगलींत मध्यवस्तींत व अत्यंत सोईची जागा बँकेनें खरेदी घेतली व तिचा कबजाहि नुकताच मिळाला आहे. बोर्ड ऑफ डायरेक्टर्सनीं इमारत फंडासाठी आपल्या फींतील कांहीं भाग 'श्री' फल म्हणून देणगी देऊन बांधकामास सक्रिय सहानुभूति दाखविली आहे.

## दि राजाराम मिशी अँड इंडस्ट्रीज लि., कोल्हापूर

वरील कंपनीचें खेळतें भांडवल १९४७ अखेर ८८,६८९ रु., १९४८ अखेर १,३३,९१८ रु. व १९४९ अखेर १,४०,५७० रु. आहे. ह्या आकड्यांवरून कंपनीची प्रगति दिसून येत आहे. "करवीर जनतेच्या लहान-मोठ्या धंद्यांना सक्रिय उत्तेजन देऊन आपल्या भारत सरकारनें आंखलेल्या उद्योगधंद्यांचे वाढीस संस्था सतत सहकार्य देत आहे. त्याचप्रमाणें भारताची आजची गरज अधिक धान्योत्पादन ही असल्यानें कंपनीनें शेती—क्षेत्रांतहि अक्षय्यतृतीयेच्या सुमुहूर्तावर पदार्पण केलें आहे. संस्थेचा व्यवहर दिवसा व रात्रौ दोन्हींहि वेळीं चालू असल्यानें श्रमजीवी, प्रतिष्ठित तसेच व्यापारी वर्गासहि त्याचा लाभ घेतां येतो." कंपनीचें वसूल भांडवल ३१,९६२ रु. असून तिचेकडे ९८,३७७ रु. च्या ठेवी आहेत. तिनें ८७,१९८ रु. कर्जाऊ दिलेले आहेत आणि ४५,६१९ रु. रोख हातांत व बँकेंत आहेत. अहवालाचे वर्षी कंपनीस २,८९१ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांना द. सा. द. शे. रु. ४ आ. ६ प्र. १२०० रु. डिव्हिडंड देण्यांत आलें. कंपनीनें यंदा दोन उत्साही डायरेक्टर ( १ ) श्री. शंकरराव दादासाहेब जाधव व ( २ ) श्री. गुलाम हुसेन साहेब बसा पैलवान ह्यांना बोर्डावर घेतलें आहे. ( चेअरमनः श्री. केशवराव रामचंद्रराव मोहिते. मॅ. एजंटसः मेसर्स राजाराम एजन्सीज [ श्री. पां. गो. चव्हाण व श्री. म. आ. यादव. ]) कंपनीची वार्षिक सभा ता. ६ मे रोजीं झाली.

## मॅनेजिंग एजन्सीची उपयुक्त कामगिरी

### टाटा इंडस्ट्रीजचें निवेदन

(“संपदा” मासिकाच्या ताज्या अंकांतील श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या लेखामधील भाग)

वास्तविक, भारतांतील औद्योगिक प्रगति मॅनेजिंग एजन्सी पद्धतीच्या पायावरच आधारलेली आहे. कोळसा, लोखंड-पोलाद, ताग, कापड, वीज, साबण, तेल, साखर, इत्यादींचे कारखाने मॅनेजिंग एजंटांनींच काढले व वाढविले. परंतु, त्याकडे दुर्लक्ष करून मॅनेजिंग एजन्सी पद्धतीची उपयुक्तता आतां उरलेली नाहीं, असें सांगण्यांत येत आहे. कोणतीहि मोठी कंपनी काढतांना तिला मॅनेजिंग एजन्सी फर्मचा मजबूत आधार लागत असे. हे उत्पादक बरेच शेअर्स घेत, चालू भांडवलाची उभारणी करीत, कारखान्याची व्यवस्था पहात आणि कंपनीच्या देण्यास जरूरीप्रमाणें जामीन रहात. मॅनेजिंग एजंट हे बहुवा सधन असत आणि कंपनीला स्वतः तरी भांडवल पुरवीत किंवा स्वतःच्या पतीवर बँकांमार्फत त्याची व्यवस्था करीत. अनुभवानेंतर ही पद्धति इतरहि क्षेत्रांत वाढली. प्रारंभीं भागीदारीच्या पेढ्या किंवा व्यक्ति ह्यांच्याकडेच मॅनेजिंग एजन्सी असे. औद्योगिक वाढीबरोबर व्यवस्थेच्या अडचणी व गुंतागुंतीहि वाढल्या आणि मॅनेजिंग एजन्सीच्या भागीदारांवर अधिकाधिक ताण पडूं लागला. साहजिकच त्यांनीं आपलें रूपांतर खासगी लिमिटेड कंपन्यांत केलें. आज बहुतेक सर्व मोठ्या कारखान्यांच्या मॅनेजिंग एजन्सीज अशा लिमिटेड कंपन्यांकडेच आहेत. अशा रीतीनें प्रगति होत असतांना कित्येक चांगल्या कार्यपद्धति निर्माण होत गेल्या, त्यामुळें औद्योगीकरणास मदत होऊन भागीदारांचा व जनतेचा विश्वास वाढण्यास मदत झाली. त्यांतील कांहींचें दिग्दर्शन येथें केलें आहे.:-

(१) कंपनी उभारण्यापूर्वी पूर्वचौकशीचें काम मॅनेजिंग एजंट करीत आलेले आहेत. अशा चौकशीस कित्येक वर्षेंहि लागत. ती पुरी होऊन योजना तयार झाली म्हणजे कंपनीची स्थापना केली जाई. ह्यामुळें कंपनीची उभारणी आणि प्रत्यक्ष कामास प्रारंभ ह्यांत फार वेळ जात नसे. कित्येक योजनांनीं मूर्त स्वरूप कधींच धारण केलें नाहीं, तरी त्यांच्या पूर्वचौकशीच्या खर्चाचा बोजा मॅनेजिंग एजंटांवर पडला. उदाहरणार्थ, कोयना धरणयोजनेची पूर्वतयारी टाटा कंपनीनें २५ वर्षांपूर्वी सुरू केली होती. मुंबई सरकारनें ती योजना नुकतीच हातीं घेतली, तेव्हां कंपनीनें आपले नकाशे, आंकडेवार पत्रकें, इत्यादि कागदपत्र सरकारच्या हवालीं कांहींहि मोबदला न घेतां केले. ह्या पूर्वतयारीवर टाटा कंपनीचे लाखों रुपये खर्च झाले होते.

(२) आपल्या देशांत उद्योगधंद्यांत गुंतवणुकीसाठी भांडवल उत्साहानें पुढें येत नाहीं. मॅनेजिंग एजंट, त्यांचे मित्र व सहकारी यांनीं नव्या कंपनीचे बरेचसे शेअर्स घेतल्यानें पैसे गुंतविणारांत बराच विश्वास निर्माण होतो. सध्याची पैशाच्या गुंतवणुकीची विशिष्ट अडचणीची परिस्थिति सोडली, तर मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचें हें बहुमोल कार्य पूर्वी महत्त्वाचें होतें, तसेंच तें पुढेंहि राहील, ह्यांत संशय नाहीं. मॅनेजिंग एजन्सीच्या जागीं दुसरी पद्धति कायद्याच्या बळावर सुरू करण्याचा दुष्परिणाम आजच्या परिस्थितींत कदाचित् दिसला नाहीं तरी तो अनुभवास आल्याविना रहाणार नाहीं; गुंतविणारे पुढें येणारच नाहींत, असें टाटा इंडस्ट्रीजचें स्पष्ट मत आहे.

(३) व्यक्तीप्रमाणें कंपन्या आपण होऊन कांहीं करूं शकत नाहींत. तेव्हां कंपन्यांच्या दैनंदिन व्यवस्थेची जबाबदारी पत्करणारे लोक आवश्यक असतात. जेथें फक्त मॅनेजिंग डायरेक्टर असतो, तेथें अगदीं वरच्या थराची व्यवस्था त्याच्या नेतृत्वाखालीं ठीक चालते. परंतु इतर सर्व पातळींवरील व्यवस्थेसंबंधीं तसें म्हणतां येणार नाहीं. मॅनेजिंग एजन्सी असली म्हणजे कंपनीच्या सर्व थरांच्या जागीं जबाबदारीच्या भूमिकेवरून कामें करणारी मंडळी असूं शकतात. लिमिटेड कंपन्यांत नेहमींच सर्व गोष्टी ठराविक नियमानुसार कराव्या लागतात आणि जबाबदारी पत्करणाऱ्या एजन्सींतील मंडळी काम करीत असली तर काम सुकर होतें.

(४) मॅनेजिंग एजन्सी पद्धतीमुळें व्यवस्थापक, आर्थिक व कायदेविषयक तज्ज्ञ, इंजिनिअर्स, इत्यादींचें सहकार्य संघटितपणें मिळूं शकतें. टाटांच्या सर्व कंपन्यांच्या व्यवस्थेसाठी नुकतीच एक स्वतंत्र मॅनेजिंग एजन्सी कंपनी स्थापण्यांत आली. ह्या मॅनेजिंग एजन्सी कंपनीच्या बोर्डावर सर्व प्रकारचे तज्ज्ञ लोक काम करीत आहेत. त्यांच्या ज्ञानाचा व अनुभवाचा फायदा कंपन्यांना मिळत आहे. परंतु ह्या बोर्डाचा पगार व खर्च ह्यांचा बोजा मॅनेजिंग एजंटच पत्करीत आहेत. मोठ्या कंपन्यांची व्यवस्था डायरेक्टरांकडे आणण्यापेक्षा अशा संघटनेकडे असण्यांत केव्हांहि फायद्याच आहे.

(५) ज्या कंपन्या चालवावयाच्या त्यांना लागणारें खेळतें भांडवल मॅनेजिंग एजंट मिळवून देतात. हें त्यांचें वैशिष्ट्य मान्य झालेलें आहे. कंपन्या जें कर्ज काढतात किंवा बँकांकडून ओव्हरड्राफ्ट घेतात त्यासाठी मॅनेजिंग एजंट गॅरंटी देतात. टाटा गटांतील कंपन्यांच्या बाबतींत—कारण त्यांत बरेच सुप्रतिष्ठित व महत्त्वाचे उद्योगधंदे आहेत—बँका अशी गॅरंटी मागत नसतील, अशी कल्पना असेल तर ती चुकीची आहे. सध्या त्या गटांतील कंपन्यांच्या बँकांकडील देण्यासाठी मॅनेजिंग एजंटांना दरसाल ५३ कोटी रुपयांपर्यंत गॅरंटी रहावें लागतें. एअर इंडिया इंटरनॅशनल लि. ह्या कंपनींत सरकारचें ४९% भांडवल आहे. तिच्या ५० लक्ष रुपयांच्या कर्जास मॅनेजिंग एजंट गॅरंटी राहिलेले आहेत; पण त्यांचा ऑफिस अलावन्स दरमहा २५० रुपये आहे. १९२३–३८ ह्या मुदतींत टाटा सन्स लि. ला जेवढा नफा मिळाला त्याच्या ७०% रक्कम त्यांना गॅरंटीच्या पोटीं भरावी लागली. टाटा गटासंबंधीं ही परिस्थिति आहे, तशी ती इतर जबाबदार एजंटांच्या बाबत कमीअधिक प्रमाणांत खरी असली पाहिजे.

(६) मोठाला धोका पत्करणें, स्वार्थत्याग करणें, दीर्घकाल भांडवल अडकवून ठेवणें, हें एका बाजूला व दुसऱ्या बाजूस उद्योगधंदे नीट प्रस्थापित झाले म्हणजे चांगला नफा मिळविणें, ही मॅनेजिंग एजन्सींचीं दोन अंगें आहेत. टाटा मिल्स (कापडगिरणी) व टाटा ऑइल मिल्स (साबण–तेलाचा भारतांतील सर्वांत मोठा कारखाना) ह्या दोन्हींचें अस्तित्व व वाढ हीं मॅनेजिंग एजंटांच्या स्वार्थत्यागामुळेंच शक्य झाली. टाटा केमिकल्सचें ह्याच संबंधांतील अगदीं ताजें उदाहरण आहे. ह्या कंपनीमध्यें मॅनेजिंग एजंटांचे ५० लक्ष रुपये गुंतलेले आहेत. त्यांच्या ठेवी बहुतेक बिनव्याजी आहेत. कंपनीचा कांहीं व्यवस्थाखर्च त्यांनींच केलेला आहे आणि तिच्या सुमारें एक कोटी रुपयांच्या कर्जास ते जामीन आहेत. ह्यामुळें कंपनी तगूं शकली असून हळूहळू ती स्थिरावत चालली आहे.

आपल्या देशांत बहुतेक सर्व क्षेत्रांत तज्ज्ञ व्यवस्थापक आणि तंत्रज्ञ ह्यांचा तुटवडा असतांना, जी कांहीं औद्योगिक प्रगति

झाली आहे, ती ज्यामुळें झाली त्या मॅनेजिंग एजन्सी पद्धतीचा नाश करण्याचा आदेश विधिमंडळास कां देण्यांत येत आहे तें कांहीं समजत नाहीं. ह्या पद्धतीची जागा घेणारी दुसरी कोणतीहि पद्धति कोणी सुचविलेली नाहीं. बँका आणि विमा कंपन्या ह्यांच्या बाबतींत मॅनेजिंग एजन्सी रद्द केल्याचा दाखला येथें उपयोगी पडण्याजोगा नाहीं. ह्या दोन व्यवसायांच्या वाढींत मॅनेजिंग एजंटांनीं फारसा भाग घेतलेला नव्हता. उद्योगधंद्यांच्या क्षेत्रांत, मात्र प्राथमिक चौकशी, दूरदर्शीपणाचें नियोजन, धोक्यांचा पत्कर, दीर्घकाळ पूर्वतयारी, प्राथमिक अवस्थेंत जोपासना इत्यादि आवश्यक असतात आणि त्या बाबतींत मॅनेजिंग एजन्सी पद्धतीनें महत्त्वाची कामगिरी केलेली आहे.

## एका मध्यमवर्गीयाचें मासिक अंदाजपत्रक

( लेखक—श्री. ल. का. कुलकर्णी, अहमदनगर )

सध्याचे दिवस अंदाजपत्रकें सादर करण्याचे आहेत. मध्यवर्ती व प्रांतीय अर्थमंत्र्यांनीं आपापलीं अंदाजपत्रकें नुकतींच सादर केलीं आहेत. अशा वेळेस श्री. पी. के. अरुण यांनीं आपलें खासगी अंदाजपत्रक 'भारत ज्योति'च्या ३० एप्रिल १९५० च्या अंकांत प्रसिद्ध केलें आहे. तें मुंबईला स्टेनोग्राफर असून त्यांचें मासिक उत्पन्न २४५ रुपये आहे. त्यांचा खर्च २५७ रुपये दाखविला आहे. मध्यमवर्गीयाला पगार पुरत नाहीं व त्यामुळें त्याची फार कुचंबणा होते असा दावा त्यांनीं मांडला आहे.

खरोखर, सध्या मध्यमवर्गीयांचे भयंकर हाल होत आहेत. मिळणारा पगार पुरत नाहीं त्यामुळें त्यांच्या आयुष्यांत सुखाचे क्षण क्वचितच दृष्टीस पडतात. माझ्या माहितींतल्या एका मध्यमवर्गीय कारकुनाचें मासिक अंदाजपत्रक पुढीलप्रमाणें आहे:—

| तपशील | रु. आ. पै |
|---|---|
| घरभाडें | २०—०—० |
| इले. लाईट चार्जेस | ३—६—६ |
| सरपण ४ मण | १२—०—० |
| कोळसा १ मण | ६—०—० |
| रेशन धान्य व साखऱ्या | १५—८—० |
| किराणा सामान व किरकोळ | १८—८—० |
| चहा कॉफी | १—४—० |
| दुधाचा रतीब | ७—८—० |
| घासलेट ( कुपनवरील ) | ०—१४—६ |
| भाजीपाला | २—०—० |
| लॉन्ड्री चार्जेस | १—८—० |
| एकादें दैनिक व साप्ताहिक | २—८—० |
| कटिंग-दाढी | १—०—० |
| टपालखर्च | ०—१२—० |
| सिनेमा सर्व कुटुंबियांसह ( महिन्यांतून २ वेळेस सरासरी ) | २—१०—० |
| साबण व टूथ पावडर | १—१४—० |
| | ९७—५—० |
| प्रॉव्हिडंड हप्ता | ३—१२—० |
| कर्जफेड हप्ता | १०—०—० |
| | १११—१—० |
| म्हणजे समजा रुपये | ११२—०—० |

त्या कारकुनाला महिन्याला ९५ रुपये पगार मिळतो. म्हणजे महिन्याला १७ ते २० रुपये कर्जाऊ किंवा उसनवार घ्यावे लागतात. वरील पत्रकांत कापडाचा, पातळांचा किंवा पादत्राणांचा खर्च धरलेला नाहीं. शिवाय बिचाऱ्याला महिन्यांतून एकादे वेळेस तरी फलफळावळ खावयास मिळते कीं नाहीं कुणास ठाऊक ? त्याला सिगरेट, पान किंवा तंबाखू यांपैकीं कसलेंहि व्यसन नाहीं ही भाग्याची गोष्ट आहे!

यावरून असें दिसून येतें कीं, मध्यमवर्गीयाला मिळणारा पगार अपुरा पडतो. बरें, समाजांत प्रतिष्ठा टिकविण्यासाठी व्यवस्थित राहणी व इस्तरीचे कपडे वापरणें त्याला आवश्यक वाटतें. माझ्या माहितींतले कांहीं कारकून असे आहेत कीं, एकवेळेला घरीं खाण्याची टंचाई सोसतील परंतु दोन दिवसांनीं परीट घडीचे कपडे वापरतील. मिळणारा मासिक पगार अपुरा पडत असतांना सुद्धां त्यांना काटकसरीनें संसार करतां येत नाहीं. असें कां ?

तो समाजरचनेचा दोष आहे असें म्हणतां येईल. 'कारकून' म्हणण्यापेक्षां 'क्लार्क' म्हणणें आवडतें. एंजिन ड्रायव्हर होण्यापेक्षां खर्डेघाशी करणें परवडतें. मेहनतीचें काम नको अशी आजच्या मध्यमवर्गीयांची स्थिति झाली आहे आणि त्यामुळेंच हा वर्ग दिवसेंदिवस कर्जबाजारी होत चालला आहे.

या उलट खालच्या वर्गाची स्थिति चांगली आहे असें म्हटल्यास वावगें होणार नाहीं. घरांत पांच माणसें असलीं तर त्यांतील चार जण मिळवते असतात. प्रत्येकाचे ६० रुपये धरले तरी महिन्याला त्यांच्या घरांत २४० रुपये येतात. असें असतांना सुद्धां त्यांना पगार पुरत नाहीं म्हणून ओरड येतेच. मध्यमवर्गीय कुटुंबांत मिळवणारा एक व खाणारे सतरा अशी परिस्थिति असते. अशा परिस्थितींत मध्यमवर्गीयाचा उन्नति होण्यास कांहीं शक्यता आहे कां ?

होय! आहे. पण प्रत्येक मध्यमवर्गीय कुटुंबानें त्याची जबाबदारी पाहून वागलें पाहिजे. अनावश्यक व चैनीच्या वस्तू यांना थारा देतां कामा नये.

वरील अंदाजपत्रक अगदीं लहान कुटुंबाचें आहे. पण समजा मिळवता एकच मुलगा आहे. वडील नाहींत. आई, बायको, पांच धाकटे भाऊ व चार बहिणी आहेत, अशा वेळेस त्या मिळवत्या मुलानें काय करावें ? भावांच्या व बहिणींच्या शिक्षणाचा प्रश्न, लग्नाचा प्रश्न कसा सोडवावा ? मिळणाऱ्या पगारांतून भावांच्या शिक्षणासाठी व बहिणींच्या लग्नासाठी कांहीं शिल्लक टाकतां येईल काय ? प्रश्नांतच त्यांचीं उत्तरें आहेत!

आजच्या मध्यमवर्गीय कुटुंबाची सर्वसाधारण परिस्थिति ही अशी आहे. यांतून मार्ग काढणें हें आपलें काम आहे. मी सुद्धां एक मध्यमवर्गीयच आहें. आपला कैवार घेण्यास श्रीमंत, सावकार, व्यापारी किंवा श्रेष्ठवर्गीय धावून येणार नाहींत. त्यांना सहानुभूतीचा साक्षात्कार झाला तर नशीब!

मध्यमवर्गीयांच्या परिस्थितीवर प्रकाश टाकणारा व त्यांतून मार्ग काढण्यास मार्गदर्शन करणारा लेख लवकरच सादर करीत आहें.

—सर्व प्रांतांतील—
सुती—गरम—रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## काळव्याच्या प्रदेशांत कपाशीची लागवड

### सरकी व खत पुरविण्याची व्यवस्था

मुंबई सरकारनें अधिक धान्य पिकवा मोहिमेस चालना देण्यासाठी १९४२ सालीं काळव्याच्या प्रदेशांत कपाशीची लागवड करण्यास बंदी केली होती. आतां सदरहू बंदी हुकूम सरकारनें रद्द केले असून काळव्याच्या व तळयाच्या पाण्यावर जरीला किंवा सी. ओ. ४ या जातीच्या कपाशीची लागवड करण्यास परवानगी यावी असा आदेश दिला आहे.

कपाशीचें जास्तीत जास्त उत्पन्न येण्याच्या दृष्टीनें पेरणी लौकर करण्याची आवश्यकता असते. तेव्हां उन्हाळ्यांत कपाशीला पाणी द्यावें लागतें. तथापि चालू सालीं आधीच इतर पिकांना पाणी देण्याचें ठरविलें असल्यामुळें गिरणा काळव्याच्या प्रदेशांत कपाशीखालील फक्त १,००० एकर जमिनीस पाणी देतां येईल. त्याचप्रमाणें गोदावरी काळव्याच्या प्रदेशांत ७०० एकर जमिनीस, प्रवरा काळव्याच्या प्रदेशांत ४०० एकर जमिनीस आणि एकरूर तलावाच्या प्रदेशांत ४०० एकर जमिनीस पाणी देतां येईल.

यासाठी अर्ज मागवून, शेतकी खात्याच्या अधिकाऱ्यांच्या सल्ल्यानें कपाशीच्या लागवडीसाठी योग्य जागा निवडून आणि १५ मे नंतर कपाशीला हंगामपूर्व पाणी देण्याची व्यवस्था करून उपरोक्त हुकूम अंमलांत आणावेत, असें संबंधित एक्झिक्युटिव्ह इंजीनिअरांना सांगण्यांत आलें आहे.

### सरकी व खताचा पुरवठा

इरिगेशन खात्यानें ज्यांचे अर्ज मंजूर केले आहेत त्या शेतकऱ्यांना सरकी व खत पुरविण्याची व्यवस्था करण्यासंबंधीं शेतकी खात्यालाहि आदेश देण्यांत आला आहे. सदरहू अर्जांतील तपशील संबंधित शेतकी अधिकाऱ्याकडे सादर केला पाहिजे.

त्याचप्रमाणें लिफ्ट इरिगेशनच्या सहाय्यानें कापूस, ऊस व पैसे देणारीं पिकें काढण्यासहि परवानगी देण्याचें सरकारनें ठरविलें आहे. या हुकुमामुळें अधिक जमीन कपाशीच्या लागवडीखालीं येईल अशी आशा आहे.

---

### देवकरण नानजी इनव्हेस्टमेंट कं. लि.

वरील कंपनीचें वसूल भांडवल २५ लक्ष रुपये असून डिव्हिडंड ई. फंड १½ लक्ष रुपयांचा आहे. कंपनीनें २२ लक्ष, ८९ हजार रुपये जॉइंट स्टॉक कंपन्यांच्या ऑर्डिनरी शेअर्समध्यें गुंतवले असून २ लक्ष, ३७ हजार रुपये प्रेफरन्स भागांत गुंतवले आहेत. शेअर्समधील एकूण गुंतवणूक २५,२५,७७४ रु. आहे, त्याची बाजारभावानें किंमत १९,०४,६२८ रु. आहे. जिंदगीचे बाजूस १,४२,५०० रु. अंडर रायटिंग कमिशन अद्याप शिल्लक आहे. ३१ मार्च, १९५० अखेर संपलेल्या वर्षीं कंपनीला डिव्हिडंडच्या रूपानें ९४,०९९ रु. मिळाले. इन्व्हेस्टमेंट विक्रीवरील नफा ३०,८३३ रुपये जमाखातीं आहे. ७,५०० रु. अंडररायटिंग कमिशन लिहून टाकल्यावर व १२,०६८ रु. मॅ. एजन्सीचें कमिशन दिल्यावर अहवालाचे वर्षाचा ६९,८७५ रु. नफा ताळेबंदांत येतो. ३% करमाफ डिव्हिडंडसाठी ७५,००० रु. लागतील. (चेअरमन: श्री. प्राणलाल देवकरण नानजी. मॅनेजिंग एजंटसः देना सन्स लि.)

---

### लॉ ॲकॅडेमी बुलेटिन

नव्या नव्या कायद्यांत इतकी एकसारखी भर पडत आहे, कीं दक्ष कायदेपंडितांसहि त्या सर्वांचें आकलन करणें कठीण जात आहे. कायदे, कानू, हुकूम ह्यांच्या जंजाळांतून चालू अंमलबजावणीच्या बाबी हुडकून काढाव्या लागतात. पुणें येथील लॉ ॲकॅडेमी ह्या संस्थेनें मार्गदर्शन करण्यासाठीं एक बुलेटिन सुरू केलें आहे. त्याचा पहिला चार पृष्ठांचा अंक १ मे, १९५० रोजीं प्रसिद्ध झाला आहे. कायद्याविषयक महत्त्वाच्या बातम्या देणें आणि मुद्दे चर्चेसाठीं मांडणें, हाहि प्रस्तुत बुलेटिनचा एक उद्देश आहे. (संपादक, प्रकाशक व मुद्रकः श्री. श्री. वि. गाडगीळ, एम. ए., एलएल. बी., लॉ ॲकॅडेमी, ७२० सदाशिव, पुणें २. वा. वं.: ट. ख. सह १ रु. मॅनेजर, ७२० सदाशिव, पुणें २.)

---

**जागतिक-आरोग्य संघटनेची वर्गणी**—ह्या संघटनेच्या सभासद राष्ट्रांपैकीं २४ राष्ट्रांनीं १९४९ सालीं आपली वर्गणी भरली नाहीं. १९४९ सालीं भारताच्या चलनाचें अवमूल्यन झालें असतांना सुद्धां भारतानें आपली सर्व वर्गणी भरली. भारताकडून १,५६,९९२ डॉलर्स इतकी वर्गणी अपेक्षित होती.

**अमेरिकन बँकांचा नफा**—अमेरिकन बँकांना १९४५ नंतर १९४९ सालीं सर्वांत अधिक नफा झाला. देशांतील १३,४३६ प्रमुख बँकांना मिळून गेल्या वर्षीं ८३ कोटी १० लक्ष डॉलर्स निवळ नफा झाला. ह्या रकमेंत प्राप्तीवरील कर धरलेला नाहीं. १९४५ सालापेक्षां नफ्याची रक्कम ८ टक्क्यांनीं अधिक आहे.

---


### ओगले ग्लास वर्क्स लिमिटेड, ओगलेवाडी.

## नोटीस

वरील कंपनीच्या भागीदारांची एकोणतिसावी वार्षिक साधारण सभा ओगलेवाडी येथील कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसमध्यें रविवार ता. ४ जून सन १९५० रोजीं दोन प्रहरीं ४–३० वाजतां खालील कामकाजाचा विचार करणेंसाठीं भरणार आहे.

(१) डायरेक्टर्स यांनीं केलेला रिपोर्ट व ता. ३१-१२-१९४९ अखेरची हिशोब तपासनिसांनीं तपासलेले ताळेबंद व नफातोटापत्रकें स्वीकारून त्यास मंजुरी देणें.

(२) आर्टिकल्स ऑफ असोसिएशन कलम १०६ प्रमाणें शेठ चतुरभाई पीतांबरदास शहा, श्रीमंत जगन्नाथमहाराज पंडित व शेठ हाजी अहिमहंमद कासम हे बोर्ड ऑफ डायरेक्टर्सवरील आपल्या जागा पाळीप्रमाणें सोडीत असून त्यांचे जागीं तीन डायरेक्टर्सची निवड करावयाची आहे. जागा सोडणारे डायरेक्टर्स पुन्हां निवडून येण्यास पात्र असून ते त्या जागांसाठी उभे आहेत.

(३) चालू सालासाठीं ऑडिटर्स नेमून त्यांचा मुशाहिरा ठरविणें.

(४) याखेरीज ऐनवेळीं जीं कामें चेअरमन सभेपुढें मांडतील त्याचा विचार करणें.

कंपनीची शेअर ट्रॅन्स्फर बुकें ता. १५ मे ते ५ जून १९५० अखेर (दोन्ही दिवस धरून) बंद राहतील.

ओगलेवाडी. ता. २४ मार्च १९५० } बोर्ड ऑफ डायरेक्टर्स यांचे हुकुमावरून एस. पी. ओगले आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस.

सूचना:—आपल्या पत्त्यांत कांहीं फेरबदल असल्यास तो कृपा करून कंपनीकडे सत्वर कळवावा.

## "मुंबई राज्यांत तेल घाण्यांना संरक्षण द्या"

### नाडकर्णी समितीच्या शिफारसी

मुंबई राज्यांत ग्रामीण भागांतील तेलाच्या घाण्यांना संरक्षण देण्याबाबतच्या प्रश्नाची चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी मुंबई सरकारनें एक समिती नेमली होती. त्या समितीनें या धंद्यास आर्थिक सहाय्य देण्याच्या दृष्टीनें दोन योजनांची शिफारस केली आहे. सदरहू समितीनें आपल्या अहवालांत म्हटलें आहे कीं सध्या या धंद्यास देण्यांत येणाऱ्या सवलती अपुऱ्या आहेत आणि त्यांना देण्यांत यावयाचें साहाय्य परिणामकारक होईल इतक्या प्रमाणांत देण्यांत यावें. निरनिराळ्या तुटपुंज्या योजनांचा आधार घेण्यापेक्षा या प्रश्नाच्या मुळाशीं जाऊन या धंद्याच्या मार्गांतील सर्व अडचणी दूर करणें हें अधिक चांगलें, या मूलभूत तत्वावर समितीच्या सर्व शिफारसी आधारलेल्या आहेत.

### सहकारी संस्था योजना

समितीनें सुचविलेल्या दोन योजनांपैकी एक योजना राज्यांत ५०० ते ६०० सहकारी संस्था स्थापण्यासंबंधींची आहे. प्रत्येक संस्थेंत ठोकळमानानें २० घाण्यांचा आणि त्या चालविणाऱ्या सर्व तेल्यांचा समावेश करावा. त्याचप्रमाणें तेलबियांच्या उत्पादकांपैकी ५० टक्के उत्पादक आणि याच प्रमाणांत तेल व पेंड यांच्या गिऱ्हाइकांना सहकारी संस्थेंत स्थान द्यावें. सध्या फार सावकाशीनें सहकारी संस्था स्थापन करण्यांत येत आहेत आणि अशा संस्थांत फक्त तेलीच असतात त्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगणाऱ्यांना त्यांत स्थान नाहीं. सध्याच्या संस्थांमुळें उत्पादनाचा खर्च कमी होत नाहीं किंवा तेल्यांपुढील सर्व प्रश्नहि सोडविले जात नाहींत, असें समितीनें म्हटलें असून तेली, तेलबियांचे उत्पादक व गिऱ्हाइक यांच्यामध्यें अधिक स्नेहपूर्ण संबंध प्रस्थापित होण्याची आवश्यकता आहे असेंहि समितीनें पढें आग्रहानें सांगितलें आहे. अशा प्रकारच्या सहकारी संस्थांना उत्पादन खर्च कमी करण्याच्या दृष्टीनें कांहीं विशिष्ट सवलती देण्याचीहि समितीनें शिफारस केली आहे. त्याचप्रमाणें उत्पादनाचा खर्च कमी करून हा धंदा स्वावलंबी होण्याच्या दृष्टीनें समितीनें अशा संस्थांना कांहीं उपायांची शिफारस केली आहे.

### सुधारलेल्या घाणीचा प्रसार

पुणें येथील ग्रामोद्योग शाळेच्या तर्फे तेल घाणीकरितां एक महिन्याचा शिक्षणवर्ग चालविला जातो हें सर्वश्रुत आहेच. वंशपरंपरागत तेली जे आहेत त्यांना २५ ते ३५ रुपयांच्या शिष्यवृत्त्या दिल्या जातात. पण निरनिराळ्या जिल्ह्यांतील अनेक वैयक्तिक सोसायट्यांकडून अर्ज आले आहेत या सर्वांच्या विनंतीला ताबडतोब मान देणें शक्य होत नाहीं. शिवाय पुणें येथें खर्चहि फार लागतो. म्हणून ग्रामोद्योग प्रयोगशाळेच्या पोटसमितीनें, जे जिल्ह्यांतील तेली लोकांना शिक्षण देण्यास व जिल्ह्यांतील लोकांना निर्भेळ तेल पुरविण्यास तयार आहेत अशा जिल्हा औद्योगिक सहकारी संघांना प्रत्येकीं एक घाण्याचा संच मोफत पुरवायचें ठरविलें आहे. हा घाणा चालविण्यासाठीं १५ फूट × १५ फूट अशी निवाऱ्याची जागा, एक कमीत कमी ८०० पौंड वजनाचा बैल, १०८" मधला व्यास असलेला लांकडी ओंडका अगर उपयुक्त अशी दुसरी लांकडी उखळी आवश्यक आहेत. औद्योगिक सहकार व ग्रामोद्योगाचे यंत्रविशारद यांनीं याबाबतींत पुढें पाऊल टाकण्याच्या इरायानें सर्व जिल्हा संघांना त्यांचीं मतें पाठविण्याची विनंति केली आहे.

बेडेकर
लोणच्याचा
तयार मसाला

स्थापना १९३६
युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा
पॅलेस स्ट्रीट, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नाशिक व बार्शी.
ता. ३१-१२-४९ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ५,००,००० |
| रिझर्व व इतर फंड्स | रु. | १,५१,००० |
| ठेवी | रु. | ६७,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षे | तीन अगर अधिक वर्षे |
|---|---|---|
| रु. २-८-० | रु. २-१२-० | ३ रुपये |

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १-८-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | २-०-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
वा. ग. चिरमुले, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

दी
बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्यांचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

स्थापनाः १९२६.
मुख्य कचेरी :
सर वर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.
तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

शाखा :
(१) गुजरी (२) शाहूपुरी-कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई-फोर्ट-(१०) मुंबई-मांडवी.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—
मुख्य कचेरींत सेफ डिपॉझिट लॉकर्सची उत्तम व्यवस्था.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.

हे पत्र पुणें, पेठ मांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनी छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.

REGISTERED No. B. 3434

**अर्थ**

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार,
इत्यादि विषयास वाहिलेलें साप्ताहिक.

**प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.**

*वर्गणीचे दर :*

**वार्षिक : ६ रु.** **सहामाही : ३ रु.**

**किरकोळ अंक : २ आ.**

*जाहिरातींचे दर :*

कराराच्या व इतर अटी जाहिरातवाल्याकडून मागवाव्यात.
चेक, मनिऑर्डरी, इ. पाठविण्याचा पत्ता:–

“ अर्थ ”
“ दुर्गाधिवास ” पुणें ४.

# अर्थ

*“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

वर्ष १६ पुणें, बुधवार तारीख २४ मे, १९५० अंक २१

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

**स्थापना : १९४३**

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहुपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

*—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—*

**श्री. बी. बी. पाटील,** B. A., LL. B., वकील सांगली चेअरमन

**श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले,** कोल्हापूर, व्हा. चेअरमन

**एल. एन्. शहा,** B. Com., C. A. I. I. B, मॅनेजर

फोनः ३४५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.


**उत्पादकांच्या ( प्रोड्यूसर्स ) सोसायट्यांना असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः–**

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन.
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

**खालील मालाच्या विक्रीस सहाय्य करतेः —**

हातमागावरील कापड ( सुती व लोंकरी ), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस अँड क्रॅफ्टस, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.





## देशी धंद्यास उत्तेजन द्या.

१ तांदुळाची गिरणी २ डाळीची गिरणी ३ उसाचे चरक
४ चक्क्या ५ गोल करवत (लाकडें कापण्याकरितां) ६ टूल ग्राइंडर्स
व इतर ओतीव काम तयार करणार.

**जी. जी. दांडेकर मशिन वर्क्स लिमिटेड**

भिवंडी जि. ठाणें
व्हाया-कल्याण ( जी. आय. पी. रेल्वे )



## विविध माहिती

**हिंदी बँकेची जपानांत शाखा**—बँक ऑफ इंडिया ह्या भारतीय बँकनें जपानमध्यें आपल्या धंद्याला प्रारंभ केला आहे. जपानमध्यें बँकेचा व्यवसाय करणारी ही पाहिलीच हिंदी बँक आहे. ता. १७ मे पासून टोकिओ शहरांत बँकेची शाखा उघडण्यांत आली आहे.

**जपानमधील मजूर चळवळ**—जपानमध्यें औद्योगिक तंट्यामुळें पूर्वी कधीहि वाया गेले नव्हते इतके कामाचे दिवस मार्च १९५० मध्यें वाया गेले, ह्या महिन्यांत २५४ औद्योगिक तंटे उद्भवले. त्यांत ११,३०,००० मजुरांनीं भाग घेतला व जवळ जवळ ४० लाख कामाचे दिवस वाया गेले. कारखान्यांच्या मालकांनीं वेतन व मजुरी अनियमित दिल्यामुळे हे तंटे झाले. फेब्रुआरीमध्यें उद्भवलेले तंटे मात्र अधिक मजुरीसाठीं झाले हाते.

**सीलोनमध्यें डॉक्टरांचा तुटवडा**—सीलोन सरकारच्या आरोग्य खात्याच्या अहवालावरून त्या देशांत डॉक्टरांची संख्या फार कमी आहे, असें दिसतें. वैद्यकीय संस्थांतून सुमारें ७७४ डॉक्टरांची जरूर आहे. परंतु फक्त ६३५ डॉक्टरांवरच भागवून घ्यावें लागत आहे. डॉक्टरांची संख्या अपुरी असल्यामुळें परीक्षा पास झाल्याबरोबर डॉक्टर्सना सरकारी नोकरी तावडतोब मिळूं शकते.

**वेस्टर्न इंडियाची नवी इमारत**—वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि. च्या सातारा येथील नव्या इमारतीच्या बांधकामासाठीं टेंडरें मागविण्यांत आलीं आहेत. इमारतीची अंदाजी किंमत ३,२५,००० रु. आहे.

**'हनुमाना'ची विक्री**—मद्रास सरकारनें आपलें आठ सीटचें 'हनुमान' हें विमान विक्रीस काढलें आहे. विमानवहातुक आतां वाढली असल्यानें, स्वतःचें विमान बाळगणें आतां सरकारला निष्कारण खर्चिक वाटत आहे.

**कराची येथें १४ मजली इमारत**—स्टेट बँक ऑफ पाकिस्तानच्या नोकरवर्गासाठी १४ मजल्यांची इमारत बांधण्यांत येत आहे. मूळ योजना ११ मजल्यांची होती.

**चहाच्या उत्पादनांत घट**—१९४८ चे मानानें १९४९ सालीं दक्षिण भारतांतील चहाच्या उत्पादनांत १० लक्ष पौंडांची घट झाली आहे. चहाच्या मळ्यांचे विभागांत पाऊस कमी पडला त्याचा हा परिणाम आहे. १९४८ मधील चहाचें उत्पादन १०,०४,३७,८७२ पौंड झालें होतें.

**हातमागांसाठी मोनॉपोली**—हातमागाच्या धंद्यास मदत करण्याच्या दृष्टीनें भारत सरकारनें उत्पादनाच्या कांहीं बाबी त्या धंद्यासाठीं राखून ठेवण्याचें योजिलें आहे. १ जूनपासून ही योजना अंमलांत येईल.

**चलनी नोटा छापण्याच्या पद्धतींत बदल नाहीं**—चलनी नोटा छापण्याच्या पद्धतींत तूर्त कोणताहि बदल करावयाचा नाहीं, असें भारत सरकारनें ठरविलें आहे. ह्या नोटा छापण्याची 'इनटॅग्लिओ' ही नवी पद्धति भारतांत सुरू करावी, असें लंडनच्या मेसर्स टॉमस डीला र्‍यू ह्या कंपनीनें सुचविलें होतें. जगांतील बहुतेक प्रमुख देशांत ही पद्धति चालू आहे. भारताला आज ही सुधारणा परवडण्याजोगी नसल्यानें सरकारनें तिचा अंगीकार करण्याचें पुढें ढकललें आहे.


# दि न्यू सिटिझन बँक

## ऑफ इंडिया, लि.

**हेड ऑफिस : १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई**

एकूण खेळतें भांडवल : ३,६०,००,००० रु. वर
वसूल भांडवल, रिझर्व्ह व इतर फंड : ११,००,००० रु. वर

★ बँक स्ट्रीटवर ★

**३,१७,००० रुपयांची बँकेची स्वतःची इमारत**

**स्थानिक शाखा :** १ दादर, २ गिरगांव, ३ पेठरोड, ४ जव्हेरी बाजार, ५ माटुंगा, ६ शींव, ७ विलेपार्ले.

**इतर शाखा :** ८ अहमदाबाद, ९ अहमदनगर, १० अकोला, ११ अमरावती, १२ बडनेरा, १३ बेळगांव, १४ चांदा, १५ कहाक टाऊन (सी. पी.), १६ दिल्ली, १७ देवळाली, १८ धुळें, १९ गुरगांव (पंजाब), २० इचलकरंजी, २१ जळगांव, २२ कारंजा, २३ कोल्हापूर, २४ कोपरगांव, २५ लोणंद, २६ महाड, २७ मालेगांव, २८ मिरज, २९ मूर्तिजापूर, ३० नागपूर शहर, ३१ नंदुरबार, ३२ नाशिक शहर, ३३ नाशिक रोड, ३४ पंढरपूर, ३५ पहाडगंज, ३६ पेण, ३७ पुणें शहर, ३८ पिंपळगांव, ३९ संगमनेर, ४० सांगली, ४१ शाहुपुरी, ४२ सिन्नर, ४३ सितावर्डी, ४४ यवतमाळ, ४५ शिवाजी नगर (पुणें), ४६ शहापूर (बेळगांव), ४७ नामपूर (नाशिक).

—बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात—

भागीदारांची संख्या २,२०० वर. ठेवीदारांची संख्या ५०,००० वर.

डी. एन. गांडेकर,
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजर, पुणें शाखा.
(बुधवार चौक)

डी. डी. देशपांडे, बी. ए.
मॅनेजिंग डायरेक्टर.



# दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल

## को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई,
स्थापन साल १९११

चेअरमन:—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.

| | |
|---|---|
| भागाचें भांडवल | रु. ३०,९१,००० |
| गंगाजळी व इतर निधी | रु. ३०,९७,८०० |
| ठेवी | रु. ७,२२,४२,००० |
| खेळतें भांडवल | रु. ९,२०,५०,००० |

**१३ जिल्ह्यांत ५७ शाखा**

हिंदी संघामधील महत्त्वाच्या शहरांमधून हुंड्या, बिलें वगैरे वसूल केलीं जातात. वेगवेगळ्या प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. त्यांच्या शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.

# अर्थ

बुधवार, ता. २४ मे, १९५०





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## भांडवली खर्चास निर्दयपणें कात्री लावणें अपरिहार्य झालें आहे

### रिझर्व्ह बँक बुलेटिनचा आढावा

भारतांतील नऊ राज्यांच्या ( मद्रास, मुंबई, सं. प्र., बिहार, मध्य प्र., पंजाब, प. बंगाल, आसाम व ओरिसा ) उत्पन्न-खर्चाचा तुलनात्मक आकडेवार तपशील रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया बुलेटिनच्या ताज्या अंकांत देण्यांत आला आहे, तो अतिशय उद्बोधक आहे. युद्धापूर्वी, सर्वच प्रांतांच्या उत्पन्नापैकी ४३·१% उत्पन्न जमीन महसुलाचें होतें. त्यांच्या एकूण ५९ कोटी रुपयांच्या उत्पन्नांत, मध्यवर्ती सरकाराकडून मिळणारा इन्कमटॅक्सचा वाटा १½ कोटी रु. सुद्धा नव्हता. जमीन महसुलाच्या खालोखाल एक्साइजचें उत्पन्न महत्त्वाचें होतें. एकूण उत्पन्नापैकी २२·२% उत्पन्न त्याचें भरत असे. मद्रास प्रांतानें विक्रीकर आकारण्यास १९३९ मध्यें प्रथमच प्रारंभ केला. त्याच्या मागोमाग शेतीच्या उत्पन्नावर कर, करमणुकीवर कर, इत्यादि कर आले व त्यांचें दर वाढत चालले. १९३८–३९ मध्यें प्रांतांच एकूण उत्पन्न ५९ कोटी रुपये होतें, ते १९४६-४७ मध्यें ( अविभक्त हिंदुस्थान ) १७३ कोटी रुपयांवर गेलें आणि १९५०-५१ मधील युनियनच्या राज्यांचें उत्पन्न २०८ कोटी रुपयांवर पोचलें आहे. चलनवाढीमुळें आणि करवाढीमुळें अशा रीतीनें उत्पन्न सालोसाल वाढत गेलें. जमीन महसूल मात्र स्वाभाविकपणेंच स्थिर राहिला. मंदीच्या काळांत जमीन महसुलाचा बोजा गरीब शेतकऱ्यावर अतिशय पडतो, परंतु पैशाच्या विपुलतेमुळें हा बोजा आतां हलका वाटूं लागला आहे. परंतु, ज्यास्त शेतीचें उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांस बिहार, प. बंगाल, ओरिसा, आसाम आणि उ. प्रदेश येथें शेतीच्या ठराविक उत्पन्नापेक्षा अधिक असलेल्या उत्पन्नावर कर द्यावा लागत आहे. एक्साइजचें उत्पन्न १९३८-३९ मध्यें १३ कोटी रुपये होतें तें १९४६-४७ मध्यें ५० कोटी रुपयांवर गेलें. आतां एक्साइजच्या उत्पन्नाची जागा विक्रीकराच्या उत्पन्नानें घेतली आहे. इन्कमटॅक्सचें एकूण उत्पन्न वाढल्यामुळें प्रांतांचा वाटाहि वाढला आहे.

### दारूबंदीचा परिणाम

दारूबंदीच्या धोरणामुळें १९४७–४८ पासून एक्साइजचें उत्पन्न उतरूं लागलें आहे १९५०–५१ च्या एकूण अपेक्षित उत्पन्नांत त्याचा हिस्सा १२% आहे. ६ एप्रिल, १९५० पासून मुंबईनें पूर्ण दारूबंदी केली. मद्रासमध्यें दारूबंदी २ ऑक्टोबर, १९४९ पासूनच सुरू आहे. मद्रास आणि मुंबई ह्यांचें एक्साइजचें उत्पन्न नऊ प्रांतांच्या १९४५–४६ मधील एकूण उत्पन्नाच्या निम्म्या-इतकें होतें, ह्यावरून दारूबंदीमुळें बुडालेल्या उत्पन्नाची कल्पना येईल. मुंबई व मद्रास वगळून इतरांनीं दारूबंदीची अंमलबजावणी मंद गतीनें चालविली आहे.

### योजनांचा अनुक्रम

शांतता-सुव्यवस्थेवरील आणि हितसंवर्धक खात्यांवरील खर्च सर्वच प्रांतांत वाढला आहे. चढीच्या किंमती त्यास मुख्यत: कारणीभूत आहेत. शिक्षणावरील खर्चानें पोलिसी खात्यावरील खर्चावरहि आघाडी मारली आहे. करवसुलीचा तौलनिक खर्च मात्र उतरला आहे, कारण मध्यवर्ती सरकारकडून प्राप्तीवरील कराची मोठी रकम मिळते तिच्या वसुलीसाठी प्रांतिक सरकारांना कांहींच खर्च पडत नाहीं. सर्वच राज्यांत शिक्षण खर्च ज्यास्त आहे. शिक्षकांच्या पगारांत वाढ, प्राथमिक शिक्षणाचा प्रसार, इत्यादींमुळें ही वाढ झाली आहे. प. बंगाल आणि पंजाब येथें मात्र पोलिस खात्यावरील खर्च अधिक आहे. पुनर्घटनेच्या व वाढीच्या योजनांस कात्री लावणें भाग पडलें आहे. अन्नधान्य व इतर अत्यावश्यक जिनसांचा उत्पादनाच्या वाढीस तात्काळ चालना देण्यासाठी आखलेल्या अल्प मुदतीच्या योजनांवरच भर द्यावा लागला आहे. 'अनुत्पादक' पुनर्घटनेच्या योजना लांबणीवर टाकणें भाग पडलें आहे. कांहीं योजनांची थोडीफार प्रगति झाली आहे, त्या तशाच टाकून देणें अर्थातच हितावह होणार नाहीं. पुनर्घटनेच्या व वाढीच्या योजनांस खालील अनुक्रमानें साधारणत: प्राधान्य दिलें जात आहे:– ( १ ) अधिक धान्य पिकवा मोहीम. ( २ ) उद्योगधंद्यांची वाढ आणि वीज उत्पादनांत वाढ. ( ३ ) रस्त्यांवरील वहातुक. ( ४ ) शेतीस पाणी पुरवठा. ( ५ ) शिक्षण. ( ६ ) इतर योजना.

### फंडांचा गैरवाजवी उपयोग

युद्धकाळांत कित्येक प्रांतांनीं आपल्या उत्पन्न–खर्चांतील वाढाव्याचा विनियोग वेगवेगळे फंड निर्माण करण्याकडे केला. उत्पन्न–खर्चांतील तूट भरून काढणें किंवा पुनर्घटनेच्या योजना, ह्यांच्यासाठी त्या फंडांचा जरूरीप्रमाणें उपयोग करून घेण्यांत येत आहे. कांहीं योजनांचा खर्च भांडवली खर्च मानण्यांत येऊन त्याप्रमाणें तो हिशेबांत दाखविला जात आहे. भांडवली योजनांच्या खर्चाची पुरेशी तरतूद चालू उत्पन्नांतून मध्यवर्ती सरकारकडून कर्ज घेऊन किंवा बाजारांत कर्ज उभारून न करतां शिलकी रकमा किंवा फंडांतील रकमा बाहेर काढल्या जात आहेत. मुंबईनें भांडवली खर्चांत कडक काटकसर करण्याचे योजिलें आहे, परंतु मद्रास व पंजाब ह्यांच्या भांडवली खर्चाच्या योजना वाढत्या प्रमाणावरच पैसा मागत आहेत. १९४८-४९ अखेर प्रांतांचें एकूण कर्ज १५५ कोटी रुपये होतें. १९५०-५१ अखेर तें २३७ कोटी रुपये होईल. त्यांच्या एकूण उत्पन्नाच्या मानानें एकूण कर्ज कमीच आहे, आणि त्यांपैकीं पाणी–पुरवठा, वीज, इत्यादींत गुंतविलेलें कर्ज व्याजहि मिळवीत आहे. १९५०-५१ मध्यें मध्यवर्ती सरकारकडून ६० कोटी रुपये कर्जाऊ मिळण्याची राज्यांच्या अंदाजपत्रकांत अपेक्षा आहे, परंतु मध्यवर्ती अंदाजपत्रकांत फक्त ३५ कोटी रुपये कर्जाऊ देण्याची तरतूद आहे. ह्या दोन रकमांतील तफावतीइतकें कर्ज बाजारांत उभें करणें शक्य होणार नाहीं. याचा अर्थ, राज्यांच्या शिलकांतून खर्च होऊन त्या कमी होणार, हें स्पष्ट आहे. अशा रीतीनें, राज्यांच्या खर्चांत अपेक्षित काटकसर झाली, तरी तेवढ्यानें भागणार नाहीं. युद्धापूर्वीच्या मानानें राज्यांच्या कराच्या बाबींत पुष्कळच बदल झाला आहे. जमीन महसूल व एक्साइज ह्या महत्त्वाच्या करांची

जागा प्राप्तीवरील कर व विक्रीकर ह्यांनी घेतली आहे. हे दोन कर एकूण करवसुलीच्या ४४% इतकी रकम देतात. येत्या दोन–तीन वर्षांत किंमती व उत्पन्न ह्यांत घट झाली तर राज्यांची करवसुलीहि कमी होईल पण खर्च त्या प्रमाणांत उतरणार नाहीं. १९५१-५२ पासून घटनेच्या २८६ व्या कलमाप्रमाणें, विक्रीकराचें उत्पन्न फारच घटणार आहे. नव्या करांसहि फारसा वाव दिसत नाहीं. स्थानिक स्वराज्य संस्थांची मागणी लोकल फिनॅन्स चौकशी कमिटीनें मान्य केली, तर राज्यांचा आर्थिक प्रश्न अधिकच बिकट होणार. बाजारांत कर्ज उभारण्याची फारशी शक्यता नाहीं आणि मध्यवर्ती सरकार अपेक्षेप्रमाणें कर्ज देण्यास असमर्थ आहे. तेव्हां राज्यांच्या पुनर्घटना योजनांच्या व इतर भांडवली खर्चास निर्दयपणें कात्री लावणें, एवढाच उपाय उरतो. फिनॅन्स कमिशनकडे सर्वच राज्यें कराच्या जादा मार्गांची आणि ग्रँटसची मागणी करतील, परंतु प्रत्येक राज्यास आपल्या कराच्या उत्पन्नाचा समाधानकारक विनियोग केल्याचें पटवून द्यावें लागेल, हें उघड आहे.

---

### अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थ्यांस डॉलरची हुंडणावळ

भारतांतील विद्यार्थ्यांना कोणत्याही शाखेचें उच्च शिक्षण घेण्यासाठी इंग्लंड–अमेरिकेला जावें लागतें. परदेशी शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांत कांहीं स्वतःच्या पैशानें जाणारे असतात आणि कांहीं सरकारी अगर खाजगी शिष्यवृत्त्या मिळवून जाणारे असतात. परदेशांतून शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी काय शिकून येतात आणि स्वदेशीं परत आल्यावर त्यांच्या ज्ञानाचा देशाला किती व कसा उपयोग होतो अथवा होऊं शकेल हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कुशल तंत्रज्ञांची भारताला आज विशेष गरज आहे. तरी सुद्धा परदेशी शिकून आलेले हिंदी तंत्रज्ञ औद्योगिक कारखान्यांतून उपयोगी पडतातच असा हमखास अनुभव नाहीं. तेव्हां परदेशीं जाऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाची आधीं तपासणी करणें योग्यच ठरेल. हिंदी रुपयाचें अवमूल्यन होण्यापूर्वी म्हणजे २० सप्टेंबर १९४९ पूर्वी ज्या विद्यार्थ्यांनीं परदेशीय शिक्षण संस्थांतून प्रवेश मिळविला आहे, त्यांची चवकशी करण्याचें भारतीय सरकारच्या शिक्षण खात्यानें ठरविलें आहे. डॉलर आणि इतर दुर्लभ चलनाच्या देशांत शिक्षणासाठी जाणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांच्या ज्ञानाचा उपयोग राष्ट्रीय हिताच्या दृष्टीनें करता येईल त्यांनाच परदेशीय हुंडणावळ द्यावी, असा सल्ला रिझर्व्ह बँकेला देण्यांत आला आहे. रिझर्व्ह बँक योग्य त्या अभ्यासक्रमासाठी पुढीलप्रमाणें डॉलर्स मंजूर करणार आहे. शिक्षणसंस्थेची वार्षिक फी, १९२० डॉलर्स. मासिक खर्च १६० डॉलर्स. प्रवासाचा खर्च. इतर अनुषंगिक खर्च दर विद्यार्थ्यामागें जास्तीत ज्यास्त ५०० रुपये. ह्या शिवाय वैद्यकीय खर्च, उपकरणें इत्यादीसाठीही डॉलर्स मंजूर करण्यांत येतील. ह्या जादा खर्चासाठी वॉशिंग्टन येथील हिंदी वकिलात आणि भारतीय सरकारचें शिक्षणखातें ह्यांचा सल्ला घेण्यांत येणार आहे.

---

रशिआ–अमेरिका व्यापार—मार्च १९५० मध्यें रशिआनें अमेरिकेकडून ५०,००० डॉलर्सपेक्षाही कमी किंमतीचा माल आयात केल्याचें प्रसिद्ध झालें आहे. युद्धासाठी उपयोगी पडणाऱ्या मालाचा रशिआला पुरवठा न करण्याच्या अमेरिकेच्या धोरणाचा हा परिणाम असावा. रशिआनें मात्र अमेरिकेला ३५ लाख डॉलर्स किंमतीचा माल पुरवला. तथापि पोलाद तयार करण्यासाठी लागणारें मँगनीज आणि क्रोम हे धातू मात्र रशिआनें अमेरिकेला पुरविलेले नाहींत.

## औद्योगिक प्रदर्शनें

(श्री. ग. वि. पुराणिक, अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई)

वस्तूंचें प्रदर्शन, सचित्र नकाशे आणि मोख्य। जाहिराती (पोस्टर्स) यांचा जसा लोकांना प्रोत्साहन देणें, माहिती देणें यांजकडे उपयोग होतो तसाच सार्वजनिक मत संघटित करण्याकडेहि त्यांचा उपयोग होतो. म्हणूनच प्रदर्शन हें कित्येक परिषदांचा देखील सर्वसामान्य असा कार्यक्रम झाल्यासारखें झालें आहे. औद्योगिक व व्यापारी प्रदर्शनांचें देशाच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीनें फार महत्त्व आहे. माल तयार करणारे, तो विकणारे व विकत घेणारे या सर्वांच्या दृष्टीनें मालाचीं प्रदर्शनें इष्ट आहेत. देशांतील मालाचा दर्जा व किंमत याबाबत बाजारांतील मत अजमावण्याचा मार्ग म्हणजे व्यापारी जत्रा व प्रदर्शनें होत. कारखानदार, देवघेव करणारे व ग्राहक यांचा संबंध प्रदर्शनें जुळवून आणतात. कारखानदारांना प्रदर्शनांमुळें आपल्या मालास बाजारपेठ उत्पन्न करतां येते, त्यामुळें तेथें येणाऱ्यांना आपणांस हवा असलेला माल मिळून माहितीहि मिळते. अर्थात् हें सर्व प्रदर्शनाच्या दर्जावर अवलंबून आहे. देशांतील औद्योगिक प्रगतीचें चित्र या अर्थानें प्रदर्शन प्रातिनिधिक व सुबक असेल तरच त्याचा उपयोग होईल.

पाश्चात्य देशांत राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय प्रदर्शनें वा व्यापारी मेळावे आणि विशिष्ट प्रकारचीं प्रदर्शनें अलिकडे नित्याचींच होऊन बसलीं आहेत. ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर, प्राग येथें भरणारी इंटरनॅशनल फेअर, टोरॉंटोची कॅनेडियन फेअर व मिलानची इटालियन फेअर हीं प्रदर्शनें जगप्रसिद्ध आहेत. विशेषतः स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतानें या पद्धतीचा स्वीकार करावयास पाहिजे. भारताची "पहिली व्यापारी जत्रा" म्हणून ओळखलें जाणारें दिल्ली येथील कारखानदारांचें औद्योगिक प्रदर्शन (१९५०) त्या दिशेनें करण्यांत आलेला एक प्रयत्न होय. दुसरें उदाहरण म्हणजे दख्खन प्रदेशांतील औद्योगिक उन्नति दाखविणारें कोल्हापूरचें 'दख्खनची दौलत' या नांवाचें प्रदर्शन हें होय.

युनायटेड किंग्डम सरकारनें बर्मिंगहॅम चेंबर ऑफ कॉमर्सच्या साहाय्यानें ब्रिटिश इंडस्ट्रीज फेअर भरविली. आपल्या देशांतील म्हैसूर व काश्मीरमधील दसरा प्रदर्शनें हीं भारत सरकार व राज्य सरकारें ह्यांनीं अनुकरण करण्यासारखीं आहेत. आपल्या आर्थिक व्यवस्थेंतील यांचें महत्त्व ओळखून भारत सरकार व राज्य सरकारें यांनीं प्रदर्शनें भरवावींत वा त्यांना साहाय्य करावें अशी सूचना करावीशी वाटते. प्रदर्शनामुळें आपल्याला आपल्या औद्योगिक प्रगतीचा आढावा घेतां येतो व बाजारपेठांतील आपल्या मालाचें स्थान कोणतें आहे तें समजण्यास मदत होते. प्रदर्शित वस्तूंनीं नवीन व अधिक उत्पादनास प्रोत्साहन मिळावें व माहिती मिळावी. माल तयार करण्याच्या कृतींतील तंत्र तेथें प्रामुख्यानें दाखविण्यांत यावें. संशोधन व प्रगति यांचें मार्गदर्शन हा प्रदर्शनामागील मुख्य हेतु असावा. देशाची संभवनीय औद्योगिक समृद्धि हें ध्येय असावें. आपले लोक लौकरच अशा दर्जाचीं प्रदर्शनें भरवूं लागतील व आपल्या औद्योगिक प्रगतीकडे यांचा मोठा उपयोग होईल अशी मला उमेद आहे.

---

## अंतर्गत बंडाळी आणि घाईचें राष्ट्रीयीकरण ह्यांचे दुष्परिणाम

### ब्रह्मदेशाचें उद्बोधक उदाहरण

ब्रिटिश पार्लमेंटरी शिष्टमंडळानें १९५० च्या प्रारंभीं ब्रह्मदेशास भेट देऊन तेथील आर्थिक परिस्थितीचें अवलोकन केलें. ब्रह्मदेशाला राजकीय स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी त्या देशाचें युद्धामुळें झालेलें नुकसान भरून येण्याच्या मार्गावर होतें, वहातुक पूर्ववत चालू झाली होती, टेलिफोन व टेलिग्राफ लायनी पुनः सुरू झाल्या होत्या, खाणींचें उत्पादन सुरू होऊन भात व टीक लाकड ह्यांच्या निर्गतीस प्रारंभ झाला होता. परंतु राजकीय स्वातंत्र्यानंतर नव्या ब्रह्मी सरकारला शांतता व सुव्यवस्था राखणें अशक्य झालें, अंतर्गत बंडाळी माजून व्यापार मंदावला, ब्रह्मदेशाचे मोठाले विभाग कम्युनिस्टांच्या नियंत्रणाखाली गेले आहेत आणि इतर कित्येक विभागांवर गुंडांचें राज्य आहे. उत्तर व दक्षिण भागांचें दळणवळण तुटल्यासारखें असून कित्येक केंद्रांकडे ये–जा विमानमार्गेच फक्त शक्य आहे. शिष्टमंडळाचे एक सदस्य मि. एफ. जे. इरॉल ह्यांनीं ब्रह्मी परिस्थितीचा आढावा दि टाइम्स रिव्ह्यू ऑफ इंडस्ट्रीच्या ताज्या (एप्रिल १९५०) अंकांत घेतला आहे, तो भारतीयांना उद्बोधक व मार्गदर्शक वाटेल. अंतर्गत शांतता व सुव्यवस्था ह्यांची आर्थिक प्रगतीस किती आवश्यकता असते, हें ब्रम्हदेशाच्या उदाहरणावरून सहज लक्षांत येईल. भारतांतील घटनांकडे ह्या दृष्टीनें जबाबदारीच्या जाणीवेनें पहाणें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य आहे.

ब्रम्ही सरकारनें समाजसत्तावादी धोरण तातडीनें अंमलांत आणण्यास प्रारंभ केला. राष्ट्रीयीकरणाचा कार्यक्रम घाईनें सुरू करण्यांत आला. अंतर्गत बंडाळी व धंद्यांचें राष्ट्रीयीकरण ह्यांच्या कचाट्यांत ब्रम्हदेश सापडून समृद्धीच्या ऐवजी विनाश त्याच्या वाट्यास येऊं लागला. दि इरावती फ्लोटिला कंपनी ह्या जगांतील त्या प्रकारच्या कंपन्यांतील अग्रेसर कंपनीची मालकी सरकारनें स्वतःकडे घेतली, तेव्हां तिच्या व्यवस्थेची जबाबदारी ब्रह्मी लोकांकडेच आली. इरावती नदीच्या खोऱ्यांतील दंगलीच्या परिस्थितीमुळें कंपनीची वहातुक कमी पडली आहे आणि तूर्त तरी तिची गैरव्यवस्था चव्हाट्यावर आलेली नाहीं. कंपनीनें आपल्या मालमत्तेची किंमत म्हणून १४,५१,००० पौंडांची मागणी केली, परंतु तिला फक्त ३,०९,००० पौंड भरपाई मिळाली.

टिंबरच्या जंगलांचेंहि राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें असून तेंहि नुकसानकारक ठरत आहे. लाकूड पुरेसें निघत नाहीं. नद्यांच्या प्रवाहांतून सोडलेलें लाकूड वाटेंत चोरलें जातें आणि त्याचा निर्गत व्यापार जवळजवळ बंद पडला आहे. लाकूड निर्गत करणाऱ्या कंपन्यांची जिंदगी उरलेली नसून, त्या भरपाईच्या रकमेची वाट पहात आहेत. भात पिकविणें हें जरी शेतकऱ्यांच्या हातांत असलें, तरी ब्रह्मी सरकारकडे त्याच्या निर्गतीचा एकमेवाद्वितीय अधिकार आहे. स्टेट ॲग्रिकल्चरल मार्केटिंग बोर्ड हें भात विकत घेऊन तें इतर देशांना विकतें. खरेदी-विक्रींतील नफा ब्रह्मी सरकारच्या तिजोरींत जमा होतो. म्हणजे, परदेशांतील चढीच्या किंमतीचा फायदा व्यापाऱ्यांऐवजी सरकारला मिळत असे. परंतु आतां भाताच्या किंमती उतरल्याकारणानें, मोसमाच्या प्रारंभीं ठरविलेल्या दरानें भाताचा उठाव होणें अवघड झालेलें आहे. भाताचें पीक विकत घेण्यास आवश्यक तो पैसा बोर्डाजवळ नाहीं. रंगूनची वीज कंपनी सरकार घेणार आहे, त्या बाबत सरकारचें पाऊल मंद गतीनें पडत आहे. इकडे वीज कंपनी आपली उत्पादन शक्ति वाढवीत असून दरमहा ६०० नवी कनेक्शनें देत आहे.

ब्रम्हदेशांतील खाणींच्या उत्पादनावर अंतर्गत अशांततेचा आणि बंडाळीचा फारच दुष्परिणाम झालेला आहे. बर्मा कॉर्पोरेशनच्या खाणी बंद पडल्या आहेत, कारण कोक आणि धातू ह्यांची ये-जा अशक्य झाली आहे. बंडाळीच्या मुलुखांतील खाणींची तर अधिकच दुर्दशा उडाली आहे. जपानी आक्रमकांना ब्रम्ही पेट्रोलियमच्या खाणींचा व तेलवाहू नळांचा उपयोग करतां येऊं नये म्हणून त्यांचा जाणून बुजून नाश करण्यांत आला होता. युद्धसमाप्तिनंतर बर्मा ऑईल कंपनीनें पुनर्रचनेवर १ कोटी पौंडावर खर्च केला तरी अद्याप पेट्रोल निघूं लागलेलें नाहीं. ज्या भागांतून पेट्रोलचे नळ जातात, त्या भागांवर बंडखोरांचाच ताबा आहे. खुद्द तेलाच्या खाणींवरील साहित्यहि सुरक्षित राहूं शकत नाहीं. परदेशी भांडवलास आणि यंत्रज्ञांस आतां ब्रह्मी सरकार स्वागतपूर्वक बोलावूं लागलें आहे, परंतु त्याच्या सुरक्षितपणाची खात्री परदेशीयांस वाटत नाहीं. गेल्या दोन वर्षांतील घडामोडीहि त्यास पोषक नाहींत. तथापि, ब्रह्मदेशांतील ब्रिटिश कंपन्या अजून आपलें ठाणें धरून आहेत. शांतता व सुव्यवस्था पुनः नांदूं लागण्याची त्या वाट पहात आहेत. ब्रह्मदेशाजवळ नैसर्गिक संपत्ति मुबलक आहे, परंतु ती उपलब्ध होण्यास विलंब लागला, तर बाकीचें जग त्यासाठीं कांहीं थांबणें शक्य नाहीं. मालाची लागवड इतरत्र वाढत आहे, इतर धान्येंहि ज्यास्त प्रमाणांत येऊं लागलीं आहेत, मध्यपूर्वेचें पेट्रोलचें उत्पादन पुष्कळच सुधारलें आहे आणि ब्रह्मी टिंबरची जागा घेणाऱ्या दुसऱ्या लाकडांचा शोध चालू आहे. ब्रम्हीं सरकारनें वेळीच परिस्थिति आटोक्यांत आणली नाहीं, तर होणारे दुष्परिणाम ब्रह्मी लोकांना पुनः डोकेंच वर काढूं देणार नाहींत. भारत सरकारनें अशा संकटाचें अरिष्ट येथें टाळण्याचा प्रयत्न चालविला आहे, परंतु त्यास लागावा तसा जोर लागलेला दिसत नाहीं. एका बाजूनें आर्थिक प्रगतीस पोषक असें शांततामय वातावरण निर्माण करावयाचें व दुसऱ्या बाजूनें प्रत्यक्ष प्रगतीचा कार्यक्रम तत्परतेनें पार पाडावयाचा, असें दुहेरी काम सरकारास करावयाचें आहे.

---

**कंपन्यांवरील गंडांतरें**—१९४९ सालीं बुडालेल्या कंपन्यांची माहिती पुढील प्रमाणें आहे. १९४९ च्या ऑगस्ट महिनाअखेर भारतांत ५२० कंपन्या बुडाल्या. त्या सर्वांचें मिळून वसूल भांडवल ५०४·७ लाख रुपये होतें. ह्याच काळांत १९४८ सालीं ३२७ कंपन्यांनीं दिवाळीं काढलीं होतीं व त्यांचें वसूल भांडवल १८·४४ लाख रुपये होतें. १९४८ सालीं ५७८ कंपन्यांनीं दिवाळीं काढलीं होतीं. त्यांचें वसूल भांडवल ३२१·७ लाख रुपये होतें. १९४८ सालच्या बारा महिन्यांत जितकीं दिवाळीं निघालीं तितकीं दिवाळीं १९४९ च्या सात महिन्यांतच निघालीं. अशाच तुलनेनें पहातां १९४९ च्या पहिल्या सात महिन्यांत १९४८ सालच्या बारा महिन्यांपेक्षां २२०·३ लाख रुपये अधिक वसूल भांडवल धोक्यांत आलें असें दिसतें.

**चितगांवला कांच कारखाना**—कराची येथें एक आणि चितगांव येथें एक असे दोन कांच कारखाने पाकिस्तानांत काढण्यांत येणार आहेत. ह्या कारखान्यांत स्वयंपूर्ण यंत्रसाहित्य बसविण्यांत येणार आहे. दोन्हीं कारखान्यांत मिळून रोज ७ टन कांचेचें सामान तयार होईल. चितगांवच्या कारखान्याला विजेचा पुरवठा करण्याची व्यवस्था झाली आहे. कराचीचा कारखानाहि उभारला जात आहे.

### दि रत्नाकर बँक लि., कोल्हापूर

३१ डिसेंबर १९४९ अखेरच्या, अहवालाचे सालीं वरील बँकेच्या खेळत्या भांडवलांत ४,५८,००० रु. ची वाढ झाली आहे. त्यापैकीं १,९०,००० रु. ची वाढ नव्या शेअर विक्रीमुळें असून २,६८,००० रु. ची वाढ ठेवींतील आहे. रत्नाकर बँक ज्या शहरांतून आहे, त्याभोंवतालच्या खेड्यांतील शेतकऱ्यांच्या मालाला तेजीचा भाव आला त्याचा परिणाम बँकेच्या ठेवी वाढण्यांत झाला आहे. पूर्वी शेअर होल्डर्स २२३ होते ते आतां ४३४ आहेत व त्यांनीं १०,०६,६०० रुपयांच्या दर्शनी किंमतीचे शेअर्स घेतलेले आहेत. बँकेचें वसूल भांडवल ४,९२,८८० रु. असून ठेवींची रकम २९,५१,४१४ रु. आहे. खेळतें भांडवल ४७,६६,१७९ रु. आहे. एवढ्या रकमेपैकीं १३ लक्ष रु. रोख, ७३⁄४ लक्ष रु. इतर बँकांत, ४१⁄२ लक्ष रु. बिल खरेदी, ७१⁄२ लक्ष रु. रोख्यांत इनव्हेस्टमेंट असे तरते पैसे असून सुमारें १३ लक्ष रुपये कर्जांत गुंतविलेले आहेत. अहवालाचे वर्षी बँकेंत ४७,६७४ रु. नफा झाला. ऑर्डिनरी भागांस ३% करमाफ डिव्हिडंड देण्यासाठी ११,०९० रु. लागले. बँक शेड्यूल्ड होण्याची पूर्वतयारी झाली आहे आणि लवकरच बँक शेड्यूल्ड होणेसाठी अर्ज पाठविला जाईल असें समजतें. रिझर्व्ह बँकेच्या तपासणीस तोंड देण्यास बँक आपण होऊन जात आहे, तेव्हां बँकेचा कारभार काटकसरीनें व दक्षतेनें चालू आहे, हें स्पष्ट दिसून येईल. बँकेची ही प्रगति अभिनंदनीय आहे. (चेअरमन: श्री. बी. बी. पाटील, बी. ए., एलएल. बी. व्हाइस चेअरमन: श्री. गं. सि. चौगुले. मॅनेजर: श्री. एल. एन. शहा, बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी.

---

### दि बँक ऑफ कोंकण लि., मालवण

वरील बँकेची १९४५ सालीं स्थापना झाली. "कोंकणच्या लोकांच्याच व्यवस्थेखालीं चाललेली" ती बँक असून तिच्या मुंबई, पनवेल, रत्नागिरी, वेंगुर्ला, कुडाळ, सावंतवाडी व बांदा येथें शाखा आहेत. बँकेचें वसूल भांडवल ५ लक्ष रु. असून एकूण ठेवी २५१⁄२ लक्ष रुपयांच्या आहेत. ताळेबंद ३३३⁄४ लक्ष रुपयांचा आहे. बँकिंग कायद्याप्रमाणें बँकेनें आणखी २१⁄२ लक्ष रुपयांचे भाग विक्रीस काढण्याचें ठरविलें आहे आणि त्यास कंट्रोलर ऑफ कॅपिटल इश्यूजची परवानगी मिळाली आहे. अहवालाचे वर्षी बँकेस एकूण १६,५३४ रु. निव्वळ नफा झाला. त्यांत ३,११४ रु. मागील शिलकी नफा मिळविल्यावर नफा वाटणीस १९,६४८ रु. येतात. त्यापैकीं ३,३५० रु. रिझर्व्ह फंडांत टाकून १६,२९८ रु. पुढील हिशेबांत घेतले जातील. त्यांतून कर वगैरे दिला जाईल. बँकेस कोंकणांतील लोकांकडून वाढता पाठिंबा मिळत आहे, त्याचा उल्लेख डायरेक्टर बोर्डानें केला आहे. अहवालाचे वर्षी डायरेक्टरांनीं बोर्ड किंवा कमिटी सभांसाठी फी घेतली नाहीं. (चेअरमन: रा. ब. यू. एस. देसाई, एम. ए. मॅ. डायरेक्टर: श्री. एम. वाय. भांडारकर.)

---

### प्रकाश दख्खन दौलत विशेषांक

प्रकाश दैनिकाच्या दुसऱ्या वाढदिवसाच्या शुभ प्रसंगानें दख्खन दौलत विशेषांक प्रसिद्ध करण्यांत आला आहे. प्रकाश दैनिकाचा हेतु एका नव्या, संयमी, समाजहितकारक वृत्तीचा प्रसार करणें हा असल्यानें, जागृत जनतेला विधायक वळण लावण्याचा त्याचा प्रयत्न असतो. दख्खन दौलत प्रदर्शनाच्या निमित्तानें संपादकांनीं काढलेला हा विशेषांक उत्कृष्ट रीतीनें संपादन करण्यांत आलेला आहे. (संपादक: श्री. न. वा. लिमये. किंमत १ रु.)

## भाडेकरूंपुढील महत्त्वाचे प्रश्न

लेखक:—श्री. श्री. वि. गाडगीळ, एम्. ए., एलएल. बी., अध्यक्ष, पुणें घरभाडेकरू संघ.

### भाडेकरूसंघांचें महामंडळ

संघाच्या गेल्या अधिवेशनानंतर भाडेकरू संघाच्या चळवळीच्या दृष्टीनें एक मोठी घटना घडून आली आहे व ती म्हणजे मुंबई राज्यांतील सर्व भाडेकरूसंघांचें एक महामंडळ स्थापन करण्यांत आलें आहे व त्याचें अध्यक्षस्थान आमच्या परिषदेचे गेल्या खेपेचे अध्यक्ष श्री. ना. म. जोशी यांनीं स्वीकारलें आहे व कार्याध्यक्षत्व बॅरिस्टर दळवी यांचेकडे गेलें आहे. भाडेकरूसंघांच्या महामंडळाच्या कल्पनेचा उच्चार १९४७ मध्यें या परिषदेच्या तिसऱ्या अधिवेशनाच्या वेळीं माझ्या भाषणांत मी केला होता व सर्वांच्या सहकार्यानें ती कल्पना या सालीं मूर्त स्वरूपांत आली ही आनंदाची गोष्ट आहे. महामंडळाची आतां स्थापना झाली असून मुंबई राज्यांतील भाडेकरूंचे सार्वत्रिक प्रश्न सामुदायिक रीत्या सोडविण्याची एक चांगली सोय झाली आहे. या महामंडळाच्या कार्यकारी मंडळावर आपल्या संघाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवडणूक झाली आहे. असो.

### पुणें नगरपालिकेचें कॉर्पोरेशनमध्यें रूपांतर

एक महत्त्वाची घटना या वर्षांत आपल्या पुणें शहरांत झाली व ती म्हणजे पुणें नगरपालिकेचें रूपांतर पुणें कॉर्पोरेशनमध्यें झालें ही होय. सदर फरकामुळें पुणें नगराच्या रचनेचें काम जोरांत सुरू झालें आहे व रस्त्यांतील खांचखळगे जाऊन डांबरी रस्त्यांचें भाग्य नगरांत पुष्कळशा भागांना प्राप्त झालें आहे. हा जो सहज लक्षांत येणारा फरक झाला त्यामुळें करांतही वाढ करण्यांत आली आहे व ती जवळ जवळ दुप्पट झाली आहे. कायद्याप्रमाणें सदरची वाढ पूर्वीच्या भाडेकरूंकडून वसूल करता येणार नाहीं ही गोष्ट खरी आहे, परंतु घरमालकांवर झालेल्या वाढीचा परिणाम या ना त्या रूपानें भाडेकऱ्यांवर संक्रमित होणार हें उघड आहे. त्या दृष्टीनें पुणें शहराची एकंदर आर्थिक परिस्थिति पाहून घरपट्टीबाबत वगैरे फेरविचार होणें जरूर आहे. वास्तविक पुणें कॉर्पोरेशनची शिफारस करणाऱ्या समितीनें हा कर जास्तींत जास्त १२ टक्क्यांहून जास्त आकारला जाऊं नये असें आपलें मत प्रदर्शित केलें आहे. परंतु नागरिकांच्या रहाणीचें मान वाढलें आहे हा भ्रम उत्पन्न करण्याकरतां घरपट्टींत वगैरे मात्र वाढ झाली आहे. त्याचा जसा फेरविचार व्हावयास पाहिजे त्याचप्रमाणें हल्लींची कारभाराची पद्धति लोकशाहीप्रधान नसल्यामुळें ती बदलून त्या जागीं कायद्यांत लिहिल्याप्रमाणें तावडतोब निवडणुका होऊन लोकप्रतिनिधींच्या तंत्राप्रमाणें हा कारभार चालविला जाणें जरूर झालें आहे.

### कॉर्पोरेशन निवडणुका व भाडेकरी

कॉर्पोरेशनचा कारभार निवडणुका होऊन वर्ष सहा महिन्यांत चालू होणें जरूर आहे व तो होईलहि. त्यासाठी आजपासून सर्व भाडेकऱ्यांनीं जागरूक राहणें जरूर आहे. भाडेकरूंना शहरांतील आपलें जीवन सुखकर करून घ्यावयाचें असेल तर नगरपालिकेच्या निवडणुकांत आपले प्रतिनिधी निवडून आणून देणें हें प्रथम त्यांचें कर्तव्य ठरेल. पाणीपुरवठा, रंगरंगोटी, घराच्या दुरुस्त्या अशा कितीतरी वरून किरकोळ दिसणाऱ्या परंतु रोजच्या व्यवहारांत अत्यंत जिव्हाळ्याच्या असणाऱ्या गोष्टी नगरपालिकेकडून व्हावयास पाहिजेत. परंतु विद्यमान कायदा त्या दृष्टीनें

असमर्थ ठरतो. तो दुरुस्त करण्याकरतां व त्या दृष्टीनें उपयुक्त असे नियम व पोटनियम करण्याकरतां आपले प्रतिनिधी आपण भाडेकरी म्हणून पाठविले पाहिजेत. गेल्या निवडणुकीच्या वेळीं आपल्या भाडेकरू संघातर्फे प्रत्यक्ष उमेदवार जरी उभे केले नव्हते तरी कांहीं उमेदवार पुरस्कृत केले होते व त्यांतील दोन उमेदवार निवडून आले. या खेपेस निव्वळ पुरस्कृत करून काम भागणार नाहीं; आपले उमेदवार आपण निवडून आणले पाहिजेत तरच नागरी जीवन सुसह्य होईल; नाहींतर भांडवलशाहीच्या वरचष्म्यांत जीवन कंठण्यावाचून मार्ग उरणार नाहीं.

**स्टँडर्डरेंट संबंधी निश्चित योजना**

भाडें नियंत्रण कायद्यांतील एक मोठा विशेष म्हणजे ठराविक भाडें ही होय. भाडेकऱ्यांच्या अडचणीचा फायदा घेऊन घरमालकांनी भरमसाट भाडें घेऊं नये म्हणून स्टँडर्डरेंट ठरविण्याची सोय करण्यांत आली आहे. परंतु हें स्टँडर्डरेंट ठरवितांना अमुक एक स्टँडर्ड ठरविण्यांत न आल्यानें फार मोठी गैरसोय होते. मी हें विधान केल्यावर पुष्कळ लोक कायद्यांतील स्टँडर्डरेंटच्या व्याख्येकडे माझें लक्ष वेधतील परंतु त्या व्याख्या ध्यानांत घेऊनच हें विधान मी मुद्दाम करीत आहे. १९४० नंतर जीं घरें बांधलीं आहेत त्यांच्या भाड्यांबाबतच जास्त झोटिंगशाही आपल्या अनुभवास येते. कायद्यांत अशा घरांचें स्टँडर्डरेंट म्हणजे प्रथम सुरवातीस ठरलेलें भाडें असें म्हटलें आहे व तें भरमसाट आहे. कीं नाहीं हें फक्त कोर्टानें ठरवावयाचें आहे. हें ठरवितांना पुराव्याचा बोजा कोणावर जातो हा पुष्कळदां वादाचा प्रश्न होऊन बसतो. घरमालक खर्चाचा फुगविलेला आकडा ठोकून देतात व पुष्कळदां कोर्टाकडून तो ग्राह्य धरला जातो. घरमालकांनीं त्याबाबतचे आपले हिशोब सादर केले पाहिजेत व ते शाबीतही करून दाखविले पाहिजेत. अमुक एका वेळीं कोणत्या दरानें किती माल घेतला व तो सर्व लागला का, या गोष्टींचा विचार होणें जरूर आहे. परंतु घरमालक हिशोब हजर करीत नाहींत. कोर्ट त्यांच्यावर सक्ति करीत नाहीं व भाडेकऱ्यांवरच अर्ज केल्याबद्दल चडफडतात व तुम्हीं पुरावा आणा असा उलटा दाव आणतात व पुरावा भाडेकऱ्यानें आणला नाहीं म्हणून घरमालकांचें आकडे ग्राह्य धरून मोकळे होतात. पुण्यांत आतां एका कोर्टाकडे या कायद्याखालचीं सर्व कामें येताहेत. या कोर्टानें स्टँडर्डरेंट ठरविण्यासाठीं आपण कोणत्या गोष्टींचा विचार करूं यांचा पुण्यापुरता खुलासा केला तरी भाडेकऱ्यांवर उपकार होणार आहेत. घरमालकांवर हिशोब ठेवण्याची कायद्यानें सक्ति केली पाहिजे म्हणजे आज जे आकडे फुगवून दाखविले जातात ते दाखविले जाणार नाहींत व कोर्टानें इमारतींचे अ, ब, क असे भेद करून त्यांचे भाव साधारणपणें ठरविले कीं तेवढा पुरावा करून भाडेकऱ्याचें काम भागूं शकेल. कायद्यांत वास्तविक अशी कांहीं सोय असावयास पाहिजे होती. परंतु स्थानांतराप्रमाणें भाडीं कमीजास्त असल्यामुळें कायदे करणारांना मुंबई राज्यांतील सर्व शहरांकरतां अगर गांवांकरतां एक नियमावली करता आली नसेल परंतु स्थानिक अधिकाऱ्यांनीं अगर कोर्टांनीं तशी ती करण्यास कांहींच प्रत्यवाय येणार नाहीं. एकदां इमारतींची वर्गवारी करून अमुक वर्गांतील घरास सामान्यतः दर खणी अगर दर चौरसफुटी एवढें भाडें असें ठरविलें म्हणजे अमुक एक इमारत कोणत्या वर्गांत बसते एवढेंच शाबीत करण्याची जबाबदारी राहील व ती पार पाडणें सोपें जाईल. इमारत पाहून कोर्टास आपलें मत त्याप्रमाणें बनवितां येईल.त्या दृष्टीनें घरमालक संघ व घर भाडेकरू संघ यांनीं नियुक्त केलेल्या एंजिनिअर्समार्फत असा तक्ता कोर्टानें तयार केला तर स्टँडर्डरेंट पाहिजे तें मिळाल्यासारखें होईल; नाहींतर या बाबत हल्लीं जो गोंधळ चालू आहे तोच राहील. पुण्यांतील स्मॉल-कॉज जज्ज याकडे लक्ष देतील अशी आशा आहे. स्टँडर्डरेंटची कामें द्याव्याइतकींच महत्त्वाचीं आहेत व तशीं तीं कोर्टांनीं समजावींत असा हायकोर्टानें त्या बाबत स्पष्ट आदेश सर्व कोर्टांना देणें जरूर आहे.

**पावत्यांसंबंधी दोन निर्णय**

पुण्यांतील पुष्कळसे घरमालक पावत्या देत नाहींत. यासंबंधीं आम्हीं भाडेकऱ्यांना वारंवार इशारे दिले आहेत व पावत्यांची मागणी करण्यासंबंधीं स्पष्ट सूचना दिल्या आहेत. तरीसुद्धां पुष्कळ मालक भाडें घेऊनही कायद्यांत सांगितल्याप्रमाणें पावत्या देत नाहींत. याबाबत येथील कोर्टांतून दोन चांगले निर्णय आपल्या संघाच्या खटपटीनें आपण मिळविले आहेत. एका बाबतींत मालकानें पावत्या दिल्या होत्या, परंतु त्या ठराविक नमुन्यांत दिल्या नव्हत्या म्हणून आम्हीं फिर्याद लावली व त्यांत घरमालकाला ५ रु. दंड झाला. दुसऱ्या ठिकाणीं भाडेकऱ्यानें चेकनें पैसे दिले व तो चेक मिळाल्याचें मालकानें पत्रानें कळविलें, परंतु रीतसर भाड्याची पावती साधी अगर ठराविक नमुन्यांत पाठविली नाहीं म्हणून आम्हीं फिर्याद केली व त्या कामींही कोर्टानें सदर घरमालकास ५१ रु. दंड केला. ठराविक नमुन्यांतील पावत्यांबाबत आम्हीं धरलेला आग्रह कित्येकांना क्षुल्लक वाटेल परंतु तसें वाटण्याचें कारण नाहीं. ठराविक नमुन्यांत ज्या पावत्या दिल्या जातात त्यावरून घरमालकाचें नांव, त्याचा पत्ता, भाड्याचा दर व बाकी व जिन्याचा आकार वगैरे सर्व गोष्टींचा उलगडा होतो व त्यामुळें कितीतरी कटकटी वांचतात. नाहींतर ह्या सर्व बाबी शाबीत होणें मुष्किल होतें. कितीतरी भाडेकऱ्यांना खरा घरमालक कोण याचा पत्ताही नसतो! ही आपत्ति अशा पावत्यांनीं आपोआपच टळणार आहे. कोर्टामार्फत जरी कायद्याचा अंमल याबाबत योग्य झाला असला तरी भाडेकऱ्यांची पावती मागणीची जबाबदारी नाहींशी होत नाहीं. त्यांनीं पावतीशिवाय भाडें देऊं नये व मग पस्तावूं नये.

**दुरुस्त्यांसंबंधी कायदा सुधारला पाहिजे**

कायद्याच्या अंमलबजावणींतला आणखी एक भाग सांगून मी आपलें हें भाषण संपवितो. कायद्यांत घर सुस्थितींत व राहण्यालायक ठेवण्याची जबाबदारी घरमालकावर टाकली आहे ही गोष्ट खरी परंतु त्यानें तें घर तसें ठेवलें नाहीं तर भाडेकऱ्याला काय अधिकार दिले आहेत? त्यानें एक महिन्याच्या भाड्यांत जी कांहीं दुरुस्ती होईल तेवढी करून घ्यावी. पुण्यासारख्या ठिकाणीं जिथें भाडीं १० रु. च्या आंतच आहेत त्या ठिकाणीं एक भाडेकरी काय करूं शकणार? या दुरुस्त्या मालकांनींच केल्या पाहिजेत व त्या त्यांनीं केल्या पाहिजेत हें ठरवून घेण्याकरतां अर्जानें काम भागलें पाहिजे. कोर्टानें अशा दुरुस्त्या करणें जरूर आहे असें ठरविल्यावर त्या दुरुस्त्या जर मालकानें केल्या नाहींत तर त्या करण्याकरता पुणें कॉर्पोरेशनकडे पाठवून याव्यात व त्यांनीं त्या करून पैसे कॉर्पोरेशनच्या इतर वसूलीप्रमाणें वसूल करावेत म्हणजे शहरांतलीं घरें चांगलीं राहून भाडेकऱ्यांची सोय होईल. याप्रमाणें घरदुरुस्त्यांबाबत कांहीं सोय झाल्यासेरीज घरांची सुव्यवस्था राहणार नाहीं.

याबाबत पुणें कॉर्पोरेशनलाही एक सूचना करणें जरूर आहे व ती म्हणजे मॅजिस्ट्रेटच्या कोर्टांत जे दंडाचे पैसे जमा होतात ते अशा दुरुस्त्यांसाठीं खर्च करण्याकरतां खास राखून ठेवावेत. म्हणजे अशा दुरुस्त्यांना पैसे कोठून उभे करावयाचे याची चिंता कॉर्पोरेशनला पडणार नाहीं.

**घरांचा प्रश्न सुटतो काय?**

वरील प्रमाणें भाडेकऱ्यांपुढच्या अनेक समस्या आहेत. शहरांत नवीन बांधकाम आस्ते आस्ते चालू आहे. परंतु त्यायोगें बहुसंख्य जनतेचा प्रश्न सुटत नाहीं. या घरांतून ७५ ते १०० रु. चे ब्लॉक्स तयार केले आहेत. एवढीं भाडीं देणारे किती नागरिक आहेत? बहुसंख्य समाज १० रुपयांपासून १५-२० रुपयांपर्यंत भाडें देणारा आहे. त्यांची सोय या नवीन इमारतींतून नाहीं. तशी सोय मोठ्या प्रमाणावर होईपर्यंत भाडेनियंत्रण कायद्याची जरूरी कायम आहे.

### दक्षिण हिंदुस्थानसाठी सायकलींची आयात

मद्रास येथें बी. एस. ए. कंपनीचा एक सायकलचा कारखाना काढण्याचें घाटत होतें हें प्रसिद्धच आहे. परंतु आतां हा कारखाना निघण्याची शक्यता कमी झाली आहे, असें समजतें. इंग्लंडमधील ज्या कारखानदाराच्या साह्यानें मद्रासमधील सायकलींचा कारखाना निघणार होता त्याचें आणि भारतीय कंपनीचें नीटसें न जुळल्यानें हा कारखाना लांबणीवर पडला आहे. ह्या 'न जुळण्याचा' तपशील बाहेर आलेला नसल्यानें प्रस्तुत प्रकरणीं फारसें लिहिण्याचें कारण नाहीं. करारमदार होऊन प्रत्यक्ष कारखाना निघेपर्यंत अशा बातम्यांवर बेताचाच विश्वास ठेवावा असें दिसतें. मद्रासमध्यें निघणाऱ्या कारखान्याला खुद्द मद्रास सरकारनें २५ लाख रुपये भांडवलाची मदत करण्याचें ठरविलें होतें. अर्थात भांडवलाचा अपुरेपणा अगर धंद्याचें स्थैर्य ह्या दोन्ही बाबतींत ह्या निघूं पहाणाऱ्या कारखान्यासंबंधीं चिंता वाटण्याचें कारण नव्हतें. आतां मद्रास प्रांतांत सायकलींचा कारखाना काढण्यासाठी बी. एस. ए. कंपनीशी दुसऱ्या एका खाजगी भांडवलदारानें बोलणीं चालूं केली आहेत. हरक्युलस सायकलींचा कारखाना मद्रास येथें काढण्याच्या कामीं मात्र एका भारतीय कंपनीला यश येईल अशीं चिन्हें दिसत आहेत. भारतांत सायकलींचे कारखाने निघून सायकलींची मागणी भागविली जाण्यास अद्याप अवकाश असल्यानें सायकलींची आयात करण्याशिवाय गत्यंतर नाहीं. मद्रास सरकारनें भारतीय सरकारकडे चालूं सालीं २ लाख सायकली आयात करण्यास परवानगी मागितली आहे. ह्या सर्व सायकली मद्रास, म्हैसूर आणि त्रावणकोर-कोचीन ह्या भागांतच विकल्या जावयाच्या आहेत.

**संयुक्त प्रांतांत उपकरणांचा कारखाना**—संयुक्त प्रांतांत लखनौ येथें सूक्ष्म मोजमाप करणाऱ्या उपकरणांचा कारखाना लवकरच सुरू होणार आहे. ह्या कारखान्यांत चालू सालीं ४५० पाण्याचे मीटर्स, ७००० वैद्यकीय पिचकाऱ्या, १५० सूक्ष्मदर्शक यंत्रें आणि २५० विजेचे मीटर्स तयार करण्याचें ठरलें आहे. संयुक्त प्रांतांत निघणाऱ्या सिमेंटच्या कारखान्यांच्या यंत्रांचा पहिला हप्ता ब्रिटनमधून सप्टेंबरमध्यें येईल. सर्व यंत्रसामुग्री १९५१ साल अखेर येईल आणि नंतर सिमेंटचा कारखाना चालूं होईल.

**कराचीला औषधाचा कारखाना**—औषधें आणि औषधासाठीं लागणारीं कच्चीं द्रव्यें तयार करणारा एक कारखाना कराचीला काढण्यांत येणार आहे असें समजतें. कारखान्याची इमारत आणि कुशल कामगार ह्यांची व्यवस्था करण्यांत आली आहे.

**मध्यभारतांत पिकांची स्पर्धा**—भारतीय सरकारच्या शेतकी खात्याचा सल्ला घेऊन अधिक पिकें काढणाऱ्यांना बोनस देण्याची योजना मध्यभारत सरकारनें आखली आहे. गहूं, भात, ज्वारी आणि बटाटे येवढ्याच पिकांना ही योजना लागू आहे.


### ट्रायब्यूनलच्या निवाड्याचे परिणाम

ऑल इंडिया इंडस्ट्रिअल ट्रायब्यूनल (बँक डिस्प्यूटस) च्या बैठकीचे वेळीं बँकांच्या नोकरांनीं त्यांना सध्या मिळत असलेल्या वेतनापेक्षा पुष्कळच ज्यास्त वेतन मागितलें आहे. ट्रायब्यूनलचा निवाडा येत्या महिन्यांत प्रसिद्ध होईल. ज्यास्त वेतन देणें बँकांना परवडणें शक्य नाहीं असें बँकांच्या वतीनें सांगण्यांत आलें, तेव्हां "अशा बँकांनीं मोठ्या बँकांशीं किंवा एकमेकांशीं एकत्रित व्हावें" असे त्यांस उत्तर मिळालें. सध्यापेक्षां ज्यास्त वेतन ट्रायब्यूनल देववील अशी आजची अपेक्षा आहे. मग मात्र लहान बँकांची परिस्थिति बिकट होईल. बँकांचें एकत्रीकरण तत्वतः ठीक असलें आणि मोठ्या परंतु थोड्या बँकांच्या कामांत पद्धतशीरपणा जास्त असण्याचा संभव असला, तरी प्रत्यक्ष एकत्रीकरण घडवून आणण्यांत अनेक अडचणी असतात. युनियन बँक आणि नाथ बँक ह्यांचें नियोजित एकत्रीकरण कुठें घडून आलें? रिझर्व्ह बँकहि एकत्रीकरणाची कोणावर सक्ती करूं शकत नाहीं; ती फक्त सल्ला व मार्गदर्शन करून मदत देऊं शकते. तेव्हां ट्रायब्यूनलच्या निवाड्याचा काय परिणाम होतो ह्याकडे लक्ष लागून राहाणें स्वाभाविक आहे.

### युनायटेड कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेनें १९४९ मध्यें कोल्हापूर, लखनौ (विद्यापीठ), शिलाँग, मुंबई (चौपाटी), अगरतळ आणि नवसरी येथें शाखा उघडल्या. ब्रह्मदेशांत मंडाले येथेंहि आतां शाखा सुरू केली आहे.

**कानपूरमधील कातड्याचा धंदा**—संयुक्त प्रांतांतील कातड्याचा आणि सतरंज्या तयार करण्याचा धंदा मोठ्या प्रमाणावर सुसंघटित केला पाहिजे असा इषारा देण्यांत आला आहे. नाहींतर हे दोन्ही धंदे परदेशी कंपन्यांच्या हातीं जाऊन राज्याचें कोट्यावधि रुपयांचें नुकसान होण्याचा संभव आहे. हे दोन्ही धंदे संघटित करण्यास ५ लाख रुपये प्राथमिक खर्च येईल आणि ते व्यापारी दृष्टीनें चालविण्यास २५ लाख रुपये लागतील असा अंदाज करण्यांत आला आहे.


बेडेकर चे मसाले वापरा


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.